शनिवार, २४ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 24 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-185 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# लातूर-टेंभुर्णी महामार्ग होणार चारपदरी

## केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची घोषणा



आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव : लातूर ते टेंभुर्णी या महामार्गाची दुरावस्था पाहून आपल्यालाही शरम वाटते. यापूर्वीच या रस्त्याचे काम पूर्ण होणे गरजेचे होते. मात्र आता लवकरच हा रस्ता चारपदरी महामार्गात रूपांतरित केला जाणार असल्याची घोषणा केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी केली. धाराशिव जिल्ह्यातील महामार्गाच्या प्रलंबित कामांसाठी २२० कोटी रूपये अधिकचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी १७४ कोटी रूपयांच्या विकासकामांचे आज भूमिपूजन होत असल्याची माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली.**

धाराशिव शहरातील सिध्दाई मंगल कार्यालय येथे केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने १७४ कोटी रूपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, सेवानिवृत्त सनदी अधिकारी तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना गडकरी म्हणाले की, लातूर-टेंभुर्णी हा मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महत्वाचा मार्ग आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी तो अत्यंत महत्वपूर्ण आहे. आजच्या घडीला या महामार्गाची प्रचंड दुरावस्था झाली आहे. लवकरच हा महामार्ग चारपदरी केला जाणार आहे. त्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. मराठवाड्यात चांगले रस्ते झाले, तरच मराठवाड्याचा विकास होईल आणि शेतकऱ्यांना आपल्या शेतातील उत्पादने कमी वेळात मोठ्या बाजारपेठेत पोहोचवता येतील. त्यातून मराठवाड्याचा सर्वांगीण विकास होईल. त्यामुळेच आपण लवकरात लवकर लातूर ते टेंभुर्णी हा चारपदरी महामार्गही पूर्ण करणार असल्याची घोषणा गडकरी यांनी यावेळी केली. पन्नास हजार कोटी रूपयांचा काश्मिर ते कन्याकुमारी हा उत्तरेकडून दक्षिणेला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. हा महामार्ग धाराशिव जिल्ह्यालाही जोडला जाणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले. भारत देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. विदर्भापेक्षाही मराठवाडा आणि परिसरात ऊसाचे उत्पन्न जास्त आहे. बागायती जमिनी सुध्दा अधिक आहेत. त्यामुळे साहजिकच साखर कारखान्यांची संख्या देखील मराठवाड्यात सर्वाधिक आहे. सगळे कारखाने इथेनॉल निर्मिती करू शकतात. मोठ्या प्रमाणात इथेनॉलची निर्मिती झाल्यास अगदी शेतकरी सुध्दा आपली स्कूटर इथेनॉलवरती चालवेल. परिणामी पेट्रोल-डिझेलच्या वाढलेल्या किंमती आपोआप कमी होतील आणि शेतकऱ्यांची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही, असे मतही मंत्री गडकरी यांनी व्यक्त केले. देशात शहरांची प्रगती होत आहे, तशीच ती ग्रामीण भागाचीही अपेक्षित आहे. केवळ सिटी स्मार्ट होवून चालणार नाही. तर खेडी सुध्दा स्मार्ट आणि प्रगत झाली पाहिजेत. दुर्गम भागात रस्ते, वीज पुरवठा करून या भागांना शहराशी जोडायला हवे. त्यासोबत मोठे व्यवसाय उभे करून तरूणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्याची भावनाही यावेळी बोलून दाखवली.

# ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे निधन झाले. शनिवारी ( 23 फेब्रुवारी ) पहाटे 3 वाजून 02 मिनिटांनी हिंदुजा हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते 86 वर्षांचे होते. 21 फेब्रुवारी रोजी त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने हिंदुजा हॉस्पिलमध्ये ॲडमिट केले होते. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे निदान झाल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. अंत्यदर्शनासाठी त्यांना माटुंगा पश्चिम, रुपारेल कॉलेजजवळील W54 या त्यांच्या सद्याच्या निवासस्थानी सकाळी 11 ते दुपारी 2 या वेळात ठेण्यात आले. दुपारी 2 नंतर अंत्ययात्रा झाली. माजी मुख्यमंत्री, माजी लोकसभा अध्यक्ष सरांवर दादर स्मशान भूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. यावेळी सर्वच पक्षातील नेत्यांची मोठ्यासंख्येने उपस्थिती होती. मनोहर जोशी यांना याआधी ब्रेन हॅमरेजचा त्रास झाला होता. त्यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाला होता, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली होती. त्यावेळी जवळपास महिनाभर जोशी यांच्यावर रूग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना रूग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. काल त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले. तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली.

# जरांगेंनी आता अट्टहास सोडावा : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाचे आरक्षण काढणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आधीच स्पष्ट केले होते. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवत मराठा समाजाला सरकारने आरक्षण दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजात समाधान तर मराठा समाजात आनंद व्यक्त केला जात आहे. जरांगेंनी अट्टहास सोडावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. फडणवीस शुक्रवारी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. फडणवीस म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण सरकारने दिले आहे. त्यामुळे कोणीही जनतेला त्रास होईल असे आंदोलन करू नये. जरांगे पाटील यांना याबाबत सांगण्यात आले असून त्यांनी आता आंदोलनाचा अट्टाहास सोडावा. आरक्षणाबाबत न्यायालयाने काय म्हटले मला माहिती नाही, असेही ते म्हणाले. नागपुरात पर्नोड रिकार्डसमवेत सामंजस्य करार होणार असून त्या कार्यक्रमासाठी आलो आहे. जवळपास २५ हजार कोटींचे करार होणार आहेत. पस्तीस हजार एकरातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

# पोलीस बंदोबस्तात बाजार समितीतील अतिक्रमण हटविले

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोट्यवधी रुपयाच्या दीड एकर जागेतील गेली २० वर्षे पासून रेंगाळलेले अतिक्रमण शुक्रवार (ता.२३) नगरपालिका, बाजार समिती प्रशासनासह मोठ्या पोलीस बंदोबस्तात बाजार समितीने काढून टाकले. कळंब बाजार समितीच्या आवारातील खुल्या जागेतील अतिक्रमणाचा वाद अनेक दिवसांपासून सुरू आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अतिक्रमणधारकांचा शेतकरी व व्यापाऱ्यांना त्रास होत होता. अखेर बाजार समितीमधील अनाधिकृतपणे केलेले अतिक्रमण हटवण्यास बाजार समिती प्रशासनाला मुहूर्त मिळाला असून बाजार समिती,नगरपालिका व मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यात आले आहे. कळंबची बाजार समिती ही धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठी आहे.कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाचा खरेदी विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी शासनाने अधिग्रहण करून जवळपास २७ एकर १२ गुंठे जमीन बाजार समितीला उपलब्ध करून देण्यात आली होती,.बाजार समितीच्या अधिग्रहण केलेल्या जमिनीवर शेतीपूरक व्यवसाय करण्यास दिलेल्या भूखंडांपैकी काही भूखंडावर विशिष्ट उद्योगासाठी राखून काही लोकांनी अतिक्रमण केले आहे. येथे अवैध दारू, चोरी व शेतकऱ्यांना लुटणे असे अनेक प्रकार वारंवार घडले आहेत. काही महिन्यापूर्वी व्यापारी, शेतकरी व हमाल यांनी अतिक्रमण काढण्यासाठी बाजार समितीकडे मागणी केली होती.

तसेच व्यापाऱ्यांनी आंदोलन व बाजारपेठ बंद ठेवली होती. मात्र सत्ताधारी अतिक्रमण काढण्यासाठी धजावत नव्हते. त्यामुळे अतिक्रमण वाढत चालले होते.बाजार समिती प्रशासन व अतिक्रमण धारक यांच्या जोरदार वाद सुरू झाला आहे. समितीच्या साधारण दिड एकर म्हणजे २० कोटी रुपये किंमत असणाऱ्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले होते. शुक्रवारी बाजार समितीने १०० पोलीस कर्मचारी, चार जेसीबी, नगरपालिका प्रशासन,बाजार समितीचे कर्मचारी, १ ड्रोन कॅमेरा, चार कॅमेरा, आदीच्या साहाय्याने अतिक्रमण काढून टाकण्यात आले. व्यापाऱ्यांना त्रास होऊ नये या करीता बाजारपेठ बंद ठेवण्यात आली असून सोमवार पर्यंत बाजार समितीच्या आवारातील व्यवसाय बंद ठेवण्यात येणार आहे.



**व्यापाऱ्यांनी सोडला सुटकेचा नि :श्वास :** गेल्या अनेक वर्षापासून अतिक्रमणाचा विषय रेंगाळत पडला होता . व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत होते .दररोज चोऱ्या होत असल्याने व्यापारयात भीतीचे वातावरण होते .बाजार समितीची सूत्रे ठाकरे गटाचे शिवसेनेचे तालुका प्रमुख तथा बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांनी हाती घेताच अतिक्रमणाचा विषय अजेंट्यावर घेतला होता .अखेर अतिक्रमण काढण्याचे व्यापाऱ्यांनी सुटकेचा नि :श्वास सोडला आहे .

# छत्रपती शिवाजी महाराज लोकहिताची मूल्य जपणारे राजे

## श्रीमंत राजे मुधोजी भोसले : गोंडवाना विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन


आधुनिक केसरी न्यूज

गडचिरोली : आजघडीला आपण शिवाजी महाराजांची जयंती आणि पुण्यतिथीला आठवण करतो.पण त्यांचे कार्य येणाऱ्या प्रत्येक पिढी साठी प्रेरणादायी आहे.

महाराजांचे व्यक्तिमत्त्व वाचले तर ते अधिक चांगले समजू शकते. महाराज हे एकमेव राजे आहेत ज्यांचे ३५० वे स्वराज्यभिषेकाचे वर्ष साजरे होत आहे. ते अन्यायाचे , अत्याचाराचे विरोधक होते. संपूर्ण देशात छत्रपती शिवाजी महाराज यांना मनाचे स्थान आहे. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे ते लोकहिताचे मूल्य जपणारे राजे आहेत. असे प्रतिपादन महाराजा ऑफ नागपूर, श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनी केले. गोंडवाना विद्यापीठात आज छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन पार पडले.त्यावेळी ते बोलत होते. श्रीमंत राजे मुधोजी भोसले हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज आहेत. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. प्रशान्त बोकारे , प्रमुख वक्ते राजमाता जिजाऊ प्रतिष्ठाण, पुणेचे अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे , कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रशांत मोहिते, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. विकास चित्ते प्रभूती उपस्थित होते. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते राजमाता जिजाऊ प्रतिष्ठाण, पुणेचे अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचा विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी , त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी तसेच स्वतःची बौद्धिक क्षमता वाढवून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर फोकस करण्यासाठी करायला हवा. त्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यावर विस्तृत प्रकाश टाकला. शिवाजी महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन स्वतःचा शोध घ्यावा म्हणजे तुमच्यातूनही कोणीतरी शिवाजी घडेल.असे ते म्हणाले. समारोपीय भाषणात प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे म्हणाले, शिवाजी महाराजांचे पराक्रम , त्यांच्या अंगी असलेले कौशल्य, सर्व धर्मसमभाव , समानता , स्वातंत्र , बंधुता, माणुसकी ही मूल्ये त्यांनी रुजविली. या अध्यासन केंद्रा मार्फत विद्यार्थ्यांमध्ये त्यांचे विचार रुजावे आणि येणाऱ्या प्रत्येक पिढी पर्यंत ते कसे पोहचवता येईल हाच आमचा प्रयत्न आहे. गोंडवाना विद्यापीठात शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व्हावे यासाठी माजी सिनेट सदस्य संध्या येलेकर यांनी प्रस्ताव ठेवला होता. त्यासाठी त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जनसंवाद विभागाचे स. प्रा. संजय डाफ यांनी श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांचा परिचय करून दिला. वक्ते प्रा. नामदेव जाधव यांचा परिचय मराठीचे स. प्रा. अमोल चव्हाण यांनी करून दिला. या कार्यक्रमाला अधिष्ठाता विज्ञान आणि तंत्रज्ञान डॉ. अनिल चिताडे, अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा डॉ.चंद्रमौली, वित्त व लेखाधिकारी भास्कर पठारे , सिनेट सदस्य स्वरूप तारगे, सतीश पडोळे, माजी सिनेट सदस्य संध्या येलेकर तसेच शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. विकास चित्ते यांनी संचालन रसायनशास्त्र विभागाचे स. प्रा. प्रशांत ठाकरे यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




# रामायणातील 'प्रेम' रस

आधुनिक केसरी

सेवक कसा असावा, भक्त कसा असावा याचा हनुमान म्हणजे मूर्तिमंत आदर्श ! एका रामाशिवाय त्याला काहीही प्रिय नाही. आपल्या स्वामींवर पराकोटीची निष्ठा असलेला हा रामसेवक आहे. लंकेत सीतामाईच्या शोधात निघालेला असताना हनुमानाची विविध प्रकारची परीक्षा सुरसा राक्षसी, मैनाक पर्वत इ. मार्फत घेतली जाते. पण केवळ ' रामकाज करने को आतुर ' असलेला हनुमान या परीक्षेत लीलया उत्तीर्ण होतो. हनुमंताच्या हृदयी राम आहेत पण रामाच्या हृदयात हनुमंताने कायमस्वरूपी स्थान मिळवले आहे. सीतेच्या शोधात आणि राम रावण युद्धात हनुमंताच्या योगदानाशिवाय विजय मिळवणे शक्य नव्हते. त्याच्या या मदतीची जाणीव रामाला आहे. ते शेवटी हनुमंताला विचारतात की मी तुला काय देऊ ? तुला द्यावं असं काही माझ्याजवळ नाही. पण माझ्या प्रेमाचं प्रतीक असलेलं आलिंगन मी तुला देतो. रामाचं आलिंगन ही हनुमंतासाठी सर्वश्रेष्ठ भेट आहे. र्यादापुरुषोत्तम असलेल्या रामाच्या हृदयातील प्रेमाला मात्र कोणतीही मर्यादा नाही. त्यानं एकदा ज्याचा हात धरला, त्याला कधीच सोडलं नाही. एकदा ज्याला हृदयाशी धरलं, त्याला कधीच दूर केलं नाही. एकदा जो त्याला शरण गेला, तो कायमस्वरूपी त्याचा झाला. सुग्रीव, बिभीषण, निषादराज या मित्रांना रामाने एकदा जे हृदयाशी धरलं, ते शेवटपर्यंत. एवढंच नाही तर अयोध्येत परतल्यानंतर राज्याभिषेकासाठी पहिलं निमंत्रण धाडलं ते या सगळ्या मंडळींना. आपल्या प्रिय व्यक्तींना उराशी धरणे, त्यांच्या कार्याची प्रशंसा करणे, त्यांच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करायला तयार होणे या सगळ्या गोष्टी म्हणजे प्रेमाच्या चढत्या पायऱ्याच ! रामायणात या सगळ्या गोष्टी आपल्याला भरभरून बघायला मिळतात. म्हणून खरं प्रेम काय असतं, कसं असतं ते समजून घेण्यासाठी का होईना रामायणातील हा ' प्रेमरस ' आम्ही समजून घेण्याची गरज आहे. प्रेमाची महती सांगताना संत कबीर म्हणतात, ' पोथी पढी-पढी जग मुआ, पंडित भया न कोय, ढाई आखर प्रेम का पढे सो पंडित होय. '



## आनंदी पहाट

# स्वतःच्या मनाचा मागोवा घेत राहावा

आधुनिक केसरी

आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार देखील केला जात नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. काहीजणांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण अलीकडच्या काळांत अधिक दिसून येत आहे. ह्याचा निश्चितच थेट संबंध आपल्या अंतर्मनाशी असतो. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्ती आत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो.
अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. अनेकदा ह्या स्वमग्नतेमुळे स्वतःच्या अस्तित्वाची देखील जाणीव रहात नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### भेटतो श्रीहरी | क्षणोक्षणी ||

**भोगोनिया भोग | निश्चिंत हो जीवा ||**
**मिळेल सुखावा | अंती तुज ||१||**
**आपले आपण | घालावे कुंपण ||**
**करावे जतन | स्वधर्माचे ||२||**
**संत सज्जनांचा | घडावा सत्संग ||**
**सोडावा कुसंग | सर्वकाळ ||३||**
**कर्माचे पुजन | श्रेष्ठ उपासना ||**
**निष्काम कामना | ब्रह्म सुख ||४||**
**भोगा अंती उठे | आनंद लहरी ||**
**भेटतो श्रीहरी | क्षणोक्षणी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

**सल आडवें गर्भपात । स्तनगुंते सनपात ।**
**संसारकोंडे आपमृत्य । या नांव आध्यात्मिक ॥४७॥**
**नखविख आणी हिंगुर्डे । बाष्ट आणी वावडें ।**
**उगीच दांतखीळ पडे । या नांव आध्यात्मिक ॥४८॥**
**झडती पातीं सुजती भवया । नेत्रीं होती राझणवडीया ।**
**चाळसी लागे प्राणियां । या नांव आध्यात्मिक ॥४९॥**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**वे हिरण्य मय कोष का,**
**ब्रह्मवेता को ज्ञान ।**
**मूढ़ ताहि जाने नहीं, जान न जगत**
**सयान ।।६०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल**
**तृतीय अध्याय) ०२/०३/६०**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**ब्रह्मवेत्त्यासच त्या प्रकाशमान कोषाचे (हिरण्यमय कोषाचे) ज्ञान असते. मूढ त्यास जाणत नाहीत, ना जगातील कुठल्या कुशल व्यक्ती जाणतात.**



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्‌गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

नाम म्हणजे भगवंताचे नाव. साधन या दृष्टीने देवाचे कोणतेही नाव घेतले तरी काही फरक पडत नाही. शेवटी सगळ्या विश्वात त्याचा संचार चाललेला असतो. नामहा जीव व शिव यांच्या मधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे व साध्य ही आहे. नाम सगुण आहे तसेच ते निर्गुण निराकार आहे. नामाचा आरंभ संगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. तो संगुणात कसा आहे ?. तर भगवंत मुळात निर्गुण निराकार आहे. तो संगुणात आलं तेव्हाच त्याला नामरूप लागले. सगुणरूप नाहिसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले. म्हणून ते निर्गुणही आहे. सगुण आणि निर्गुण भक्ताला आधार नामाचाचं आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारा दुवा. चित्त शांत झाले की आपोआप वृत्ति सुधारेल, वृत्ति सुधारली की चित्त शांत होईल. चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. देहबुध्दि जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते. म्हणजेच नाम हे परमात्मस्वरूप आहे. सतत चित्तशुद्धी साठी नामस्मरण आवश्यक आहे. या समासात श्री समर्थांनी वेदांत दृष्ट्या आणि साधनदृष्टया एक फार मौल्यवान गोष्ट सांगितली आहे. ती अशी की आपण जे जग पहातो ते संबंध चराचर विश्वाला व्यापून टाकले आहे.आणी ते दृष्य आहे आपण ते डोळ्यांनी पहातो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंचात स्त्रीने कसे वागावे ?

आधुनिक केसरी

पतिसेवा हाच आपला धर्म । प्रपंचाचे कर्तव्य हेच आपले सत्कर्म । अंतरी समाधान हेच आपले साधन ॥ सर्वांनी राहावे सुखी । रामनाम नित्य घ्यावे मुखी ॥ सर्व सुखाचा लाभ । घरबसल्या मिळतो देव ॥ कर्तव्यी असावे तत्पर । मुखी नाम निरंतर ॥ देहाने करावी सेवा । याहून दुजा लाभाचा नाही ठेवा ॥ परमात्म्याने जे जे दिले । ते ते त्याचे म्हणून सांभाळणे भले ॥ त्या लोभात न गुंतवावे चित्त । हाच परमार्थ सत्य ॥ नसावे कशाचे ज्ञान । वाटावे सदा घ्यावे रामनाम । प्रपंची राहावे समाधान । हेच भक्ताचे मुख्य लक्षण जाण ॥ पतिव्रता साध्वी थोर थोर । त्यांचे करावे स्मरण । जे करील पुण्यवान ॥ न बोलावी पतीस दुरुत्तरे । समाधान राखोनि अंतरे । जे सज्जनांस आवडेल खरे ॥ पतीपरते न मानावे दुजे दैवत । घरात राखावे नेहमी समाधान ॥ तुमच्या पतिसार'यांची संगति । हीच भाग्याची खरी प्राप्ति ॥ त्यांच्या आज्ञेने वागावे । त्यांच्या सुखात आपले सुख पाहावे ॥ राम धरिता चित्ती । प्रपंचाची काळजी त्याचे हाती ॥ प्रपंची असावे खबरदार ॥ परी लोभात न गुंतावे



अंतर । धन संग्रही राखावे । सर्वच खर्चून न टाकावे । ही प्रपंचाची रीत । सर्व जगात आहे चालत ॥ जगाची रीत लोभात असणे । हे मात्र आपणास न आवडावे ॥ देहाने करावी पतिसेवा । ध्यानी धरावा रामराया । त्याचा संसार उत्तम झाला । हाच आशीर्वाद माझा भला ॥ प्रपंचाची संगति । काळजीची उत्पत्ति । तेथे धरिता नामाची संगति । काळजीविरहित आनंद देई ॥ मुलीच्या लग्नाची काळजी करू नये । प्रयत्नाला सोडू नये । प्रयत्नाअंती परमेश्वर । हे सज्जनांचे बोल । मनी ठसवावे खोल ॥ आरंभी ज्याने स्मरला राम । त्यालाच प्रयत्नाअंती राम । हा ठेवावा विश्वास । सुखे साधावे संसारास ॥ मिष्ट भाषण वरिवरी । विष आहे अंतरी । असल्याची संगत नसावी बरी ॥ मी तुम्हास सांगतो हित । दृश्यांत न ठेवावे चित्त । राम सेवेकरता प्राण । म्हणून करणे आहे जतन ॥ मान अपमान जगतात । ते मूळ कारण झाले घातास ॥ कोणतेही काम करीत असता । राखावी मनाची शांतता । अगदी व्यवहारबुद्धीने कामे करावी सर्वथा ॥ आप्तइष्ट सखेसज्जन । यांचे राखावे समाधान । परी न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने । चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे ॥

**७०. रामावर ठेवावा विश्वास । सुखाने करावा संसार ॥**

## कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

तेव्हा क्षणाचाही विलंब न करता अंबाजीने ती फांदी तोडली व ते विहिरीत पडले, आणि रथ पुढे गेला. संध्याकाळी सर्व शिष्यांना अंबाजीची आठवण झाली. इतक्या वेळ पाण्यात राहिल्याने अंबाजी मृत झाले की काय अशी भीती सर्व शिष्यांना होती. ते समर्थांना घेऊन त्या विहिरीजवळ आले. समर्थांनी अंबाजीला विचारले 'अंबाजी, कल्याण आहेना ?' तेव्हा आत पाण्यातून उत्तर आले 'स्वामी, आपल्या कृपेने कल्याण आहे'. तेव्हापासून अंबाजी हे कल्याण स्वामी म्हणून ओळखले जाऊ लागले. ही घटना मसूर येथे घडली. 'कल्याणा, छाटी उडाली'.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २४ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# देशी दारूची अवैध वाहतूक करणारे चारचाकी वाहन पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**चामोर्शी :** गडचीरोली जिल्ह्यात दारूबंदी असली तरी चंद्रपूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणत देशी - विदेशी दारूचा पुरवठा केला जात असल्याचे दिसून येत आहे.

दि.२२ फेब्रुवारी रोजी गोंडपिपरी हून आष्टी मार्ग गडचीरोली जिल्ह्यात देशी दारूची वाहतूक करणारे वाहन आष्टी पोलिसांनी पकडले त्यामुळे अवैध देशी दारूची तस्करी करणारे मोठे रॅकेट असल्याची दाट शक्यता आहे.

गोंडपिपरी -आष्टी मार्गावर एका चारचाकी वाहनाने अवैध देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती आष्टी पोलिस स्टेशनचे ठाणेदार कुंदन गावडे



यांना मिळाली असता पोलीस सहकाऱ्यांना घेवून आष्टी आलापल्ली मार्गावर चौडामपल्ली रस्त्यावर पोलिस तैनात केले. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाची तपासणी करीत असताना एम एच ३४ ए ए ५३६८ क्रमांकाची चारचाकी वाहन भरधाव वेगाने येताना दिसताच अडवून तपासणी केली असतासदर वाहनात खाकी खरड्याच्या बॉक्स मध्ये २ पेट्या देशी दारूच्या सापडल्या ज्यावर रॉकेट देशी संत्रा प्रवरानगर डीस्टीलरी असे लाल रंगाने लिहलेले होते. खोक्यात ९० मिली मापाचे १०० टिल्लू दिसून आले. दोन खोक्यात मिळून एकूण २०० निपा सापडले. प्रति निप ज्याची अवैध किंमत ८० रुपये दराने १६००० रुपये व पांढ्या रंगाच्या चार चुंगडी मध्ये देशी दारूच्या २०० नीपा सापडल्या असे एकूण ८०० निपा प्रति नीपची अवैध किंमत ८० रू प्रमाणे ६४,००० रुपये असा एकूण ८० हजार रुपये व चारचाकी वाहनांची किंमत २ लाख रुपये असा एकूण २ लाख ८० हजाराचा मुद्देमाल आष्टी पोलिसांनी जप्त करत आरोपी सागर विलासराव चर्लावार वय ४२ वर्ष रा. गोंडपीपरी जी.चंद्रपूर यावर कलम( ६५ अ )महाराष्ट्र दारू कायदा नुसार गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. ही कारवाई गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक निलोत्पल,अप्पर पोलीस अधीक्षक चिंता सर, उपविभागीय पोलिस अधिकारी कोकोटे, यतिश देशमुख,यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलिस स्टेशनचे ठाणेदार कुंदन गावडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अतुल तराळे,राजू येंनगंटीवार,अतुल तोडासे ,राजूरकर,संतोष नागुलवार यांनी केली आहे.



# भैय्यासाहेब कोठुळे 'आदर्श ग्रामसेवक'ने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामविकास अधिकारी भैय्यासाहेब दिलीपराव कोठुळे यांना सन 2019-2020 या वर्षाचा आदर्श ग्रामसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते कोठुळे यांनी पुरस्कार स्विकारला. शहरातील भिस्तबाग येथे पार पडलेल्या पर्यटन सांस्कृतिक कार्य विभाग तसेच जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महासंस्कृती महोत्सव कार्यक्रमात जिल्हा परिषदेचा आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, खासदार सदाशिव लोखंडे, जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजी कर्डिले, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजीराव लांगोरे, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ आदी उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी भैय्यासाहेब कोठुळे यांनी ग्रामपंचायत सालवडगाव व बेलगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर या ग्रामीण भागातील शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे केली. तर ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे रहाणीमान व अडचणी सोडविण्यात सर्वतोपरी सहाय्य केले. या उत्कृष्ट कार्यामुळे त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पालकमंत्री विखे पाटील यांनी पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती तसेच ग्रामसेवकांचे अभिनंदन केले.
भैयासाहेब कोठुळे हे सध्या नेवासा तालुक्यातील गेवराई ग्रामपंचायत येथे कार्यरत आहेत. सदरील पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रस्त्यासाठीचे उपोषण आश्वासनानंतर मागे

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** दलित वस्ती कडे जाणाऱ्या रस्त्यावर होणारे बांधकाम थांबवून दत्ता मोकळा करा या मागणीसाठी ग्रामपंचायत समोर सुरू केलेले उपोषण आज (ता.२३)एका तासातच मागे घेण्यात आले.दरम्यान सरपंच व ग्रामसेवक यांनी प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी एक महिन्याची लेखी मुदत मागितली आहे. सुनील झीने, महादू झिने व निवृत्ती झिने यांनी त्यांच्या घराकडे जाणारा रस्ता मोकळा करा, दिगंबर नंदाजी पालेकर यांनी सदर रस्त्यावर अतिक्रमण करून घराचे बांधकाम सुरू केले आहे. सदर बांधकाम तात्काळ थांबवा अशा मागणीसाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायतला निवेदन दिले होते. दरम्यान ग्रामपंचायत निवडणूक सदर बांधकाम थांबवून सरपंच,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठित नागरिकांनी दलित वस्ती कडे जाणारा रस्ता खुला करण्याच्या उद्देशाने संबंधितांची बैठक बसविली

> आमच्या नावाने आठ अ मध्ये असलेल्या क्षेत्रफळावर आणि बांधकाम करीत आहोत, आम्ही गरीब वस्तीचा रस्ता अडवत नाही गरीब वस्तीत जाण्यासाठी तीन रस्ते आहेत मात्र गावात दोन समाजात सामाजस्य कायम राहावा म्हणून आम्ही ५ फुटाचा रस्ता सोडावयास तयार आहोत
> **– डिगांबर नंदाजी पारेकर बांधकाम धारक,गिरोली बु .**

यामध्ये आठ फुटाचा रस्ता सोडा अशी तक्रारकर्त्यांची मागणी होती तर बांधकाम धारक पाच फूट रस्ता सोडायला तयार झाले मात्र सदर प्रश्नावर तोडगा निघाला नाही.दरम्यान आज सुनील झीने व महादू झीने यांनी ग्रामपंचायत समोर उपोषण सुरू केले. दरम्यान सरपंच संजय कव्हळे,माजी सरपंच लक्ष्मण कव्हळे,युवा नेते हर्षवर्धन देशमुख,तंटामुक्तीचे अध्यक्ष नामदेव मगर, उपसरपंच भरत झिने, ग्रामसेवक तिडके यांनी उपोषणकर्त्यांची चर्चा केली,व सदरप्रश्नावर सोडता काढण्यासाठी एक महिन्याची मदतमागितली आणि उपोषण केदार तसंच मागे घेण्यात आले.






# अखिल भारतीय पोलिस क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीत गडचिरोली पोलिसांना कांस्यपदक

## उपनिरीक्षक अनपट यांची भारतीय पोलिस स्पर्धेत कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** अखिल भारतीय पोलिस क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये येथील उपनिरीक्षक सूरज सुनील अनपट यांनी महाराष्ट्र पोलिस संघाचे नेतृत्व करत यशस्वीपणे निशाणा साधत कांस्यपदकाला गवसणी घातली. यामुळे जिल्हा पोलिस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील गडचिरोलीत पोलिस अधिकारी व अंमलदारांना दुर्गम, अतिदुर्गम भागात कर्तव्य बजवावे लागते. नक्षल्यांशी दोन हात करताना अनेक पोलिस अधिकारी विविध कलागुण जोपासत असतात. दरम्यान, आरमोरी पोलिस ठाण्यात कार्यरत उपनिरीक्षक सूरज अनपट हे तिरंदाजीतील उत्कृष्ठ खेळाडू म्हणून ओळखले जातात. कर्नाटकच्या बेंगळुरू येथे झालेल्या १२ व्या अखिल भारतीय पोलिस तिरंदाजी स्पर्धेत त्यांनी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले. महाराष्ट्र पोलीस संघाने आयटीबीपी संघाचा ६-४ अशा फरकाने पराभव करत कांस्यपदक पटकावले. उपनिरीक्षक अनपट यांचा २१ फेब्रुवारी रोजी पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सत्कार केला. यावेळी अपर अधीक्षक (अभियान)यतीश देशमुख, अहेरीचे अपर अधीक्षक एम. रमेश उपस्थित होते.

# शेतकरी गटाने दिली परभणी येथील पश्चिम विभागीय कृषी मेळाव्याला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील श्री स्वामी समर्थ शेतकरी गट, निमखेडी व सत्यशोधक शेतकरी गट, जरंडी या दोन गटातील प्रत्येकी १५ सदस्य यांनी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी येथे आयोजित पश्चिम विभागीय कृषी मेळावा या कार्यक्रमाला दिनांक – २३ फेब्रुवारी २०२४ रोजी भेट दिली. यात प्रामुख्याने कृषी क्षेत्रात विकसित झालेली सुधारित औजारे, पिकांचे नवीन सुधारीत वाण, किटकनाशके व खते यांची माहिती शेतकरी वर्गाने घेतली तसेच सदरील मेळाव्यात दिनांक – २१ ते २३ फेब्रुवारीया कालावधीत विविध मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते यातील आजच्या प्रमुख कार्यक्रमाना सदरील शेतकरी वर्गाने हजेरी लावली होती. एकंदरीत सदरील मेळाव्यास भेट देऊन सदरील गटातील शेतकरी वर्गाचे समाधान झाले. सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन आत्मा कृषी विभाग सोयगाव यांचे मार्फत करण्यात आले होते.



# अमेरिका पुन्हा चंद्रावर

आधुनिक केसरी

गेल्या काही वर्षात अवकाश तंत्रज्ञान क्षेत्राती बड्या देशांनी चंद्रावर लक्ष केंद्रीत केलं आहे. चीन, भारत, जपान यासारख्या देशांनी चंद्रावर यशस्वीरित्या लँडर उतरवले आहेत आणि त्या देशांच्या रोव्हरनी चंद्रावर मुक्त संचारही केला आहे. आता त्यात चंद्रावर विजय मिळवणाऱ्या अमेरिकेचीही भर पडली आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार पहाटे ४ वाजून ५३ मिनिटांनी अमेरिकेच्या Intuitive Machines या कंपनीचे Odysseus नावाचे लँडर हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अलगदपणे उतरले. ज्याला IM-1 या नावानेही ओळखले जाते. Odysseus Lunar lander चे एकुण वजन १९०० किलो आहे. १५ फेब्रुवारीला या यानाचे प्रक्षेपण करण्यात आले, २१ फेब्रुवारीला हे यान चंद्राच्या कक्षेत पोहचले होते. IM-1 हे सहा पायांचे असून ४.३ मीटर उंचीचे षटकोनी आकाराचे आहे. याचा आकार एका छोट्या SUV एवढा आहे. १९ डिसेंबर १९७२ ला अमेरिकेच्या अपोलो १७ मोहिमेच्या माध्यमातून अमेरिकेचे शेवटचे दोन अंतराळवीर हे चंद्रावर उतरले होते. अपोलो मोहिमे अंतर्गत अमेरिकेचे एकुण १२ अंतराळवीर हे चंद्रावर उतरले होते. तेव्हाच्या चांद्र स्पर्धेत सोव्हिएत रशियावर अमेरिकेने विजय मिळवला होता. यानंतर थेट चंद्राभोवती विविध यानं जरी अमेरिकेने पाठवली असली तरी प्रत्यक्ष चंद्रावर उतरणारी कोणतीही मोहिम आखली नव्हती. आता Artemis program मोहिमेच्या माध्यमातून चंद्रावर मुक्काम करण्याची मोहिम अमेरिकेच्या नासाने हाती घेतली आहे. २०२५ नंतर अमेरिकेचे अंतराळवीर चंद्रावर पुन्हा उतरत काही दिवस मुक्कामही करणार आहेत. ही अर्थात अत्यंत खार्चिक मोहिम असणार आहे. या मोहिमेसाठी विविध कंपन्यांची मदत नासा घेत आहे, चांद्र मोहिमांकरता त्यांना अर्थिक आणि तांत्रिक सहाय्य करत आहे. याचाच एक भाग म्हणून Intuitive Machines कंपनीचे यान चंद्रावर उतरले आहे. पुढील १४ दिवस ते कार्यरत असेल आणि चंद्रावरील विविध माहिती यानावरील संवेदकांद्वारे गोळा केली जाणार आहे. अमेरिकेतील भविष्यातील चांद्र मोहिमांसाठी या कंपनीची मदत घेतली जाणार आहे.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592


# श्री गुरुजींचे प्रेरणादायी जीवनप्रवाह

आधुनिक केसरी

**अगोदर विचार जन्माला येतो व नंतर क्रांती घडते, असे म्हटले जाते. प.पु. डॉ. हेडगेवार व गुरुजींनी हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हा विचार मांडला. आज तो भारतीय जनतेने स्वीकारला आहे. गुरूजींचे विचार आधुनिक भारताच्या मांडणीसाठी दिशादर्शक व पथदर्शक ठरले आहे. त्यांचे समर्थक आणि विरोधक यांच्यात एक दशकभर विचारयुद्ध चालले होते. परंतु अखेर काळाने हिंदुत्व विचाराचे प्राबल्य सिद्ध केले आहे.**

रामचंद्र गुहा यांच्या मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया या ग्रंथामध्ये गुरुजींनी भारतापुढे असलेले धोके मांडले व त्याबद्दल देशाला सतर्क केले असे म्हटले आहे. त्यांच्यावर टीका करण्यात आली तरी हिंदुत्व विरोधी समीक्षकांनीसुद्धा त्यांच्या प्रभावी प्रतिपादनाचे व प्रमेयांचे महत्त्व जाणल्याचे दिसते. गुरुजी म्हणतात, राष्ट्राची आणि संस्कृतीची शुद्धता टिकून ठेवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नात सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. संस्कृती संवर्धनासाठी सामुदायिक प्रयत्न आवश्यक आहेत. एकात्मता ही इतिहासदत्त आहे आणि संस्कृतिक चैतन्याचा वसा टिकवून तो वाढविण्यासाठी नित्य नवा चांगला धडा घ्यावा लागेल. आपल्या संघटनेवर ब्रिटीशांची वक्रदृष्टी येऊ नये म्हणून गुरुजींनी मोठ्या चतुराईने संघटनेस सुरक्षित ठेवले. त्यांच्या वैचारिक प्रभावातून एकीकडे दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवतावाद मांडला. तर दुसरीकडे प्रा. बलराज मधोक यांनी भारतीयकरण हा सिद्धांत मांडला. गुरुजींच्या चिंतनातून आणि वैचारिक प्रभावातून देशात हिंदुत्वाची लाट निर्माण झाली.

**प्रेरणादायी वारसा :** श्री गुरुजींनी संघकार्यातील सेवा तत्वज्ञानाचा विकास केला. समाजाच्या सुखदुःखात स्वयंसेवकांनी कसे समरस व्हावे याचा आदर्श त्यांनी समोर ठेवला. आधुनिक भारतामध्ये महात्मा गांधींनंतर श्री गुरुजीं एवढा वैचारिक प्रभाव कुणालाही टाकता आला नाही. कारण दोघेही सत्तेपासून दूर राहिले व त्यांनी हिंदुत्व विचारांचा परिपोश केला. नाशिक येथे अभिनव भारत या संघटनेच्या विसर्जन प्रसंगी वि. दा. सावरकांच्या समवेत गुरुजी उपस्थित होते व त्यांनी या प्रसंगी 'ओम् राष्ट्राय स्वहः' हा मंत्र दिला. आपल्या उत्तर काळात स्वतःच स्वतःचे श्राद्ध करून त्यांनी आहुती दिली. जैव तंत्रज्ञान आणि राज्यशास्त्र यांचा अभ्यासक असलेले गुरुजी सागरी जैवशास्त्रात संशोधन करू इच्छित होते. परंतु त्यांनी भारतीय समाज पुरुषाच्या चैतन्य शक्तीस जागविण्यासाठी केलेले संशोधन अधिक मोलाचे ठरले. त्यांनी केलेला स्वदेशी सिद्धांताचा विकास आत्मनिर्भर भारताला नवे बळ देणारा ठरला. हिंदुत्वाचे रूपांतर त्यांनी विशाल वटवृक्षात केले. त्यांच्या आधारवडातून निर्माण झालेल्या साठ पारंब्या नव्या रचनात्मक विकासाचे नवे प्रयोग करत आहेत. आधुनिक भारताच्या लोकशाही विकासात आणि नव हिंदुत्वाची नवी दिशा प्रकट करण्यात गुरुजींचे योगदान त्यामुळे महत्त्वाचे ठरले. काही



जयंती विशेष

विचारवंत त्यांना द्वेषाचे गुरु संबोधतात. परंतु काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत देशभर पसरलेल्या संघाच्या सेवाभावी कार्यातून समरसतेचा नवा आदर्श उभा राहिला आहे. संपन्न व स्वावलंबी भारताचे नवे स्वप्न साकार होत आहे. त्यावेळी गुरुजींच्या स्मृतीला अभिवादन करताना त्यांच्या दूरदृष्टीचे विशेष महत्त्व आहे.

**ओम राष्ट्राय स्वाहा :** गुरूजी काळाच्या पुढे विचार करीत होते. त्यांनी चिनी आक्रमणाचा धोका ओळखला होता. तसेच पाकिस्तानी दहशहवादी राष्ट्र होईल व अंतर्गत विभाजनामुळे देश कमजोर होईल शेवटी अखंड भारताची निर्मिती ही एक इतिहासदत्त प्रक्रिया असेल, समर्थ व बलशाली भारताच्या उभारणीसाठी प्रत्येक स्वयंसेवकाला आपापल्या परीने योगदान द्यावे लागेल, असे त्यांचे सूत्र होते. अंतर्गत स्थैर्य आणि भक्कम परराष्ट्र धोरण व मजबूत संरक्षण यंत्रणा उभारण्याचे काम, भारत जगामध्ये महासत्ता होईल हे त्यांचे भाकित खरे ठरत आहे. ओम राष्ट्राय स्वाहा असे म्हणून त्यांनी आपले समग्र जीवन राष्ट्र उभारणीच्या यज्ञामध्ये स्वयंप्रेरणेने समर्पित केले.

यज्ञकुंड पेटले सज्ज व्हा उठा चला, या काव्यपंक्तीप्रमाणे त्यांनी शेकडो तरुणांना या राष्ट्र उभारणीच्या यज्ञात समर्पित करण्याचे आवाहन केले. जोवर ध्येय साध्य होत नाही, तोवर चालत रहा हा त्यांचा मंत्र होता. रामकृष्ण मिशनच्या तालमीत तयार झालेल्या गुरुजींनी एखाद्या तपस्वी साधु संतांप्रमाणे आपले जीवन देशासाठी समर्पित केले.

**समारोप :** मानवेंद्रनाथ रॉय यांनी बुद्धी आणि प्रेरणा या क्रांतीचा आधार असतात असे म्हटले होते. कार्ल मार्क्सच्या मते, विचारांचे दारिद्य हे सर्वात भयावह असते. गुरुजींनी भारतातील बुद्धिवंतांच्या विचार दारिद्यावर मात करून आध्यात्मिक राष्ट्रवादाचे नवे प्रमेय मांडले. गुरुजींच्या जीवनकार्याचा वेध घेतला असता असे दिसते की, रामकृष्ण मिशनच्या तालमीत तयार झालेले आध्यात्मिक महापुरुष होते. त्यांची स्वप्ने साकार होण्याचा सुवर्णकाळ समीप आला आहे. गोळवलकरांनी भारताच्या राष्ट्रीय जीवनात हिंदुत्व विचारांचे जागरण घडविले. त्यांचे दूरदृष्टीचे विचार आजही पुनः प्रत्ययाचा अनुभव देतात. त्यांचे ऋण, नवभारताच्या उभारणीतील त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही. संपूर्ण परिपूर्ण आणि सुविकसित समताधिष्ठित नवभारताची उभारणी हेच गुरुजींचे खरे स्वप्न होते. अशा शोषणमुक्त, कृषि औद्योगिक समाजाची उभारणी करणे हेच गुरुजींचे खरे स्मरण ठरेल. बदलत्या काळात हिंदुत्वाचा विचार अधिक विज्ञानधिष्ठ अधिक काल सुसंगत व प्रगत होत आहे. परंतु हिंदुत्वाच्या विकासातील एक मैलाचा दगड म्हणून गुरुजींच्या विचारधनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांना हिंदुत्वाची बैठक देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न पायाभूत स्वरूपाचे ठरले. मध्यम वर्गाचा राजकारणातील सहभाग त्यांनी अधिक रचनात्मक केला. बंधुत्वातून समतेचा मंत्र दिला. प्रगती आणि विकासातील हिंदुत्वाचे पुनरुत्थान दिशादर्शक ठरले. हिंदुत्व चळवळीला विस्तीर्ण आणि लोकाभिमुख रूप देण्यात गोळवलकरांचे योगदान अमर ठरले आहे. त्यांनी अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवानी यांच्यासारख्या भारतरत्नांचा विकास त्यांच्या विचारवैभवातून झालेला दिसतो. त्यांच्या या ऐतिहासिक कार्यामुळे भारताचे उज्ज्वल भवितव्य हे हिंदुत्व विचाराच्या विकासावर अवलंबून आहे हे त्यांच्या या सूत्रामुळे भारताच्या उभारणीत एक नवे क्रांतिकारक परिवर्तन दृष्टीपथात आले आहे. स्वतंत्र प्रज्ञेवर आधारित आत्मनिर्भर आणि स्वावलंबी भारताची उभारणी करण्यात त्यांचे योगदान मोलाचे ठरले. हे त्यांच्या कार्याचे वेगळेपण होय. त्यांच्या ऋषितुल्य कार्यामुळे गुरुजी आधुनिक भारताच्या इतिहासात अमर झाले आहेत. संघटन कार्याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी नवभारतापुढे ठेवला. राष्ट्रजीवनाच्या विविध अंगाबाबत त्यांनी मूलगामी क्रियाशील विचारदर्शन घडविले. ते सर्वार्थाने राष्ट्रऋषी होते. भारतीय ऋषी परंपरा वर्तमान काळात समृद्ध व संपन्न करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. त्यांच्या व्यक्तिमत्वातील त्याग, सेवा व समर्पणाचा आदर्श सतत प्रेरणा देत राहील. दिव्यत्वाची जेथ प्रचिती । तेथे कर माझे जुळती ।। असा भक्तिभाव त्यामुळे प्रत्येक स्वयंसेवकाच्या हृदयात एखाद्या नंदादीपाप्रमाणे तेवत आहे यात शंका नाही.

***नाही पुण्याची मोजणी,***
***नाही पापाची टोचणी,***
***जिणे गंगौघाचे पाणी***
***असे त्यांच्या निर्मळ***
***जीवन प्रवाहाचे वर्ण न करावे लागेल.***



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# परमार्थिक दिसण्यापेक्षा असणं गरजेचं

आधुनिक केसरी

**सृष्टी वरील जीवमात्रांच हित स्वहिता पेक्षा श्रेष्ठ समजुन परोपकारी वृत्ती ने लोककल्याण करण्यासाठी निस्वार्थ भावनेने समर्पित भाव ठेवून आपल्या कार्यक्षेत्रात कार्य करण्याचा भाव आवश्यक असतो.कार्य क्षेत्र कोणतही असेल महत्व क्षेत्राला नाही तर आपण तिथे कार्य करत असताना आपला भाव आपली वृत्ती आणि लोकहित लोक कल्याण होण महत्वाचं असतं. कार्य करताना आपला भाव हाच अंतिम महत्वपूर्ण असला पाहिजे.लोक कल्याण लोक हित परकोपकार हेच सर्वपरी असण गरजेच असत.स्व हित स्व कल्याण महत्वाकांक्षा,आशा , अपेक्षा स्वार्थ,मोह याचा एतकिंचत सुद्धा लवलेश नसला पाहिजे अशी स्वतःची वृत्ती तयार करणं अथवा असं व्यक्तिमत्त्व होण्यासाठी प्रयत्न करणं म्हणजे परमार्थ असतो. हा शब्द समजण्यासाठी सोपा तितकाच आहे जितका तो अवघड आहे.परमार्थ हा शब्द दिवसातुन अनेकदा,अनेक वेळा नव्हे कित्येक वेगवेगळया ठिकाणी आपल्या कानावर पडत असतो.**

बहुतांश लोक मला परमार्थ करायचा आहे म्हणून नानाविध मार्ग शोधत असतात.त्याचा अर्थ प्रत्यक्षात ज्याला समजला त्याला परमार्थ करण्याची आवश्यकता नाही.कारण परमार्थ हा दिसण्यासाठी नाही तर आपण स्वतः परमारर्थिक असलं पाहिजे मग दिसण्याची आवश्यकता भासणार नाही.आपल्या प्रत्येकाच्या मनात इच्छा असते कि मला परमार्थ करायचा आहे.परमार्थ करायचा आहे म्हणजे नेमकं काय करायचं आहे.हेच न समजल्यामुळे आपण परमार्थ करण्या ऐवजी परमार्थिक आहेत हे दिसण्यात धन्यता मानतो.दिसण्यासाठी अहोरात्र खटाटोप करतो. दिसण हे अंतिम उपयोगी नाही तरी सुद्धा असण्या पेक्षा दिसण्या मध्येच प्रत्येकाला जास्त ऋची असते.दिसण आणि असणं यांच्या मध्ये जमिन असमानच अंतर आहे.तरी आपल्याला दिसायला आवडत पण कृतीमध्ये नको असत इथच आपण कमी पडतो.मी किती परमारर्थिक आहे हे दाखविण्यासाठी आपण अग्रेसर आहेत पण हिच अग्रेसरता असण्या मध्ये असली पाहिजे.आणि मुळात आपण इथंच कमी पडतो याचा अर्थ परमार्थ काय आहे.हाच आपल्याला आजुन तरी निट पणे समजलेला नाही.परमार्थ म्हणजे काय त्याच खरं सामर्थ्य काय हे समजलं कि आपलं जीवन लोक कल्याणासाठी समर्पित होत.सृष्टी वर आपण का



जन्माला आलो हे तर कित्येक लोकांना न सुटलेले कोडे आहे . बहुतांश लोकांनी आप आपल्या सोयीनुसार अर्थ लावलेले आहेत. आपल्याला जो अर्थ समजला त्या नुसार आपण आपलं कार्य करत त्याच पद्धतीने पुढे घेऊन जाण्याचा सपाटा लावलेला असतो.हाच सपाटा म्हणजेच मुळ अर्थ समजल्या शिवाय जो तो आप आपल्या सोयीनुसार आप आपल्या पद्धतीने विषाद करत आहे. मग खरा परमार्थ मुळ परमार्थ आपल्या पासून किती कोसो दुर अंतरावर आहे हे आपल्या लक्षात कधी येईल अथवा कुणी लक्षात आणून दिल तर ते आपल्या पचेल रुचेल आणि आपण ते मान्य करू का? मग परमार्थ करण्याची इच्छा मनात असणं त्यासाठी प्रयत्न करणं आणि खरया अर्थाने परमारर्थिक होण या पैकी सोपं शाश्वत आणि खरं कोणत आहे.पण खरं खोटं हे कळलं तर बरोबर उत्तर येईल अन्यथा असत्याला सत्य मानुन धावण्याचा लावलेला सपाटा अशा जगी जाऊन थांबेल कि तिथुन पुन्हा परत फिरण्यासाठी फार फार काही पर्याय उपलब्ध नसतात.खरया अर्थाने आध्यत्मिक जीवन परमार्थ या बाबी समजल्या तर खूप सरळ साध्या सोप्या आहेत.जो परमार्थ खरा आहे तो शाश्वत परमार्थ आहे. करणं तो सगळ्यात उत्कृष्ट आणि सोपं आहे.फक्त परमार्थ आत्मियतेने केला पाहिजे तो मनापासून असला पाहिजे.दिसण्यासाठी केला तर मग मात्र फार काही उल्लेखनीय साध्य होईल असं निश्चितच नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# प्रत्येक गावात मराठा समाजाचा रस्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** शासनाने मराठा आरक्षणाच्या संदर्भात सगेसोयरे हा अध्यादेश जोपर्यंत काढत नाही तोपर्यंत शनिवार तारीख 24 पासून कळंब तालुक्यातील प्रत्येक गावात रस्ता रोकोचे आयोजन करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे, या निवेदनावर सकल मराठा समाजाच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनात म्हटले आहे की, आरक्षणबाबत शासनाने, सगे सोयाऱ्याचा अध्यादेश जोपर्यंत काढत नाही तोपर्यंत , प्रत्येक गावात सकाळी 10 ते 1आणि दुपारी 4 ते 7 या वेळेत हा रस्ता रोको आंदोलन होणार असून, यात प्रत्येक गावातील समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# चामोर्शी येथे विश्वकर्मा जयंती व पांचाळ समाज मेळावा

आधुनिक केसरी न्यूज




**भास्कर फरकडे**

**चामोर्शी :** येथे दि. 22 फेब्रुवारीला विश्वकर्मा पांचाळ समाज समितीच्या वतीने पोलीस स्टेशन समोर असणाऱ्या नाग मंदिर येथे प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव व समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीमती यशोदा सुनील देवजवार तर प्रमुख पाहुणे संदीप उद्धव बद्देलवार, विलास किरमीरवार, यशवंत मुम्मडवार, सुहास कागदेलवार, रवींद्र येरोजवार, अतुल केशवार, उषा गजानन कागदेलवार, विनोद चिटलोजवार व पांचाळ समाजातील बहुसंख्य बांधव, भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी पांचाळ समाजाचे प्रभू विश्वकर्मा देवाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून रथ सजवून महिलांची कलश यात्रा काढण्यात आली.

कार्यक्रमाला येणाऱ्या पाहुण्यांचा स्वागत शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. चामोर्शी येथील जयलक्ष्मी महिला भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला, सांस्कृतिक नृत्य स्पर्धा घेण्यात आली स्पर्धेत अनेक मूल, मुली, महिलांनी भाग घेतले यात प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना शिल्ड बक्षीस ठेवण्यात आले होते. चामोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राठोड यांच्या हस्ते बक्षीसाचे वितरण करण्यात आले कार्यक्रमानिमित्य स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता बहुसंख्य समजबांधवानी आपली उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक उमेश गझलपेल्लीवार व आभार सूरज येरोजवार यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शैलेश कागदेलवार, प्रवीण अडपल्लीवार, सागर देवजवार, विजय कागदेलवार, प्रवीण कामदार, राजू श्रीमंतवार, केतन कत्रोजवार, रवी कालेश्वरवार, अविनाश कागदेलवार व युवावर्गांनी प्रयत्न केले.

# ठेवीदारांचे ठेवी परतीसाठी प्रसासनाकडे निवेदन सादर

आधुनिक केसरी न्यूज



**शहादा :** तालुक्यातील सहकारी पतसंस्थांचे ठेवीदार ठेवी परत मिळणेसाठी गेल्या वर्षभरापासून पतसंस्थांचे संचालक व अधिकारी यांचेकडे मागणी करीत आहेत. मात्र संबंधित संस्थाचालक व अधिकारी आणि सहकार खात्याने टाळाटाळ करीत आहेत. सदर पतसंस्था ह्या संस्थाचालक व अधिकारी यांच्या गैरव्यवहार अवैधपणे केलेला खर्च वेळीच ऑडीट होत नसते.यामुळे बंद पडल्या असून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शहादा यांच नियंत्रण शुन्य असल्याने संस्था बंद होत असल्याची चर्चा आहे. शहादा तालुक्यातील (१)कै.आर.एफ.पाटील सह.पत.शहादा, (२) कै.का.स.पाटील सह पत.शहादा,(३)मातोश्री सह. पत. शहादा, (४)महात्मा गांधी सह.पत. शहादा,(५)जययोगेश्वर सह. पत.ब्राम्हणपूरी. यां व अशा अनेक पतसंस्थां बंदच्या मार्गावर असल्याचे समजते. त्यामुळेच भारतीय जनसंसद संघटना,व ग्राहक पंचायतीचे सर्व पदाधिकारी यांनी सदर ठेवीदारांना सहकार्य करावे म्हणून एकत्रीत लढा देण्याचा निर्धार केला असून जोपर्यंत ठेवी परत मिळणार नाही तोपर्यंत हा लढा चालुच राहील असा निर्णय घेण्यात आला.यामुळेच आज संबंधीत संस्था चालक व संबंधित कर्मचाऱ्यां विरूध्द कायदेशीररीत्या कार्यवाही व्हावी आणि ठेवीदारांना त्यांच्या अडकलेल्या ठेवी लवकरात लवकर पूर्ण परत मिळव्यात यांसाठी दि.२०/२/२०२४ रोजी भारतीय जनसंसद संघटना व ठेवीदार यांनी म.सहायक निबंधक सहकारी संस्था शहादा, प्रांताधिकारी शहादा, विभागीय पोलीस अधिकारी शहादा, पोलीस निरीक्षक शहादा, व तहसीलदार शहादा यांना लेखी निवेदन दिले.यां निवेदनावर जनसंसद संघटनेचे जिल्हाध्यक्ष एकनाथ गिरधर पाटील, सचिव सुरेश विठ्ठल तालुकाध्यक्ष प्रसन्न सुभाष बंब,संघटक गिरधर विक्रम मोरे, शहराध्यक्ष प्रदीप काशिनाथ कामे,ग्राहक पंचायतीचे तालुकाध्यक्ष उदय निकुम,के. डी.गिरासे सरव्यवस्थापक नंदुरबार जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थांचे सह फेडरेशन मर्या शहादा जि नंदुरबार यांचेसह ठेवीदारांच्या सह्या केल्या आहेत.

# गुरु रविदास जयंतीनिमित्त युवा व्याख्याते गिरीश बनकर यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सालाबाद प्रमाणे या वर्षी सुद्धा क्रांती संत गुरु रविदास यांचा ६४७ वा जयंती उत्सव हा सर्वत्र विचारमंथनाने संपन्न होत आहे.लोणंद ता.खंडाळा येथे सुद्धा जयंती सोहळ्याचे आयोजन करत असताना व्याख्यान कार्यक्रम ही घेण्यात आलेला आहे.श्री गुरु रविदास मंदिर ट्रस्ट,क्रांती संत गुरु रविदास जयंती उत्सव समिती,समस्त डोईफोडे हितवर्धक संस्था (रजि.,समस्त हराळे वैष्णव चर्मकार समाज यांच्या वतीने क्रांती संत गुरु रविदास यांचा जयंती सोहळा हा शनिवार दि.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता गुरु रविदास मंदिर येथे संपन्न करण्यात येणार आहे.या सोहळ्यातून पाडेगाव ता.फलटण येथील सामाजिक कार्यकर्ते व युवा व्याख्याते गिरीश बनकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.





मुख्य प्रवर्तक रविंद्र खंडेराव डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सिमा वैभव खरात ह्या असणार आहेत. तसेच राष्ट्रवादी कॉं.पार्टीचे सातारा जिल्हा उपाध्यक्ष दयानंद खरात,सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील,डॉ.नितीन सावंत विचारमंचचे अध्यक्ष डॉ.नितीन सावंत,माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव सोपानराव शेळके-पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल शेळके- पाटील,खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती विनोद (दादा) क्षीरसागर,खंडाळा तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सर्फराज बागवान,सुन्नी मुस्लीम जमातीचे अध्यक्ष राजुभाई कुरेशी, लोणंद नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष रविंद्र रमेश क्षीरसागर,लोणंद इंजिनीयर ॲन्ड आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव इम्रान बागवान,सर्व नगरसेवक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या व्याख्यान कार्यक्रमाच्या निमित्ताने गिरीश बनकर यांचे विचार ऐकण्याची संधी सर्वांना मिळणार आहे.गिरीश बनकर हे गेली अनेक वर्षांपासून महापुरुषांचे विचार लोकांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहेत.

ते अगदी वास्तव आणि परखड मांडणी करत असतात.ते स्वतः जयंती उत्सवाच्या निमित्ताने अनेक व्याख्यात्यांना आमंत्रित करत असतात. गिरीश बनकर हे विविध कार्यक्रमातून व्यक्त होत असतात.त्यामुळे अशा युवा वक्त्याची बोलण्यातील भाषा ही सर्वांच्या हृदयाला भिडत आहे.महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार लोकांमध्ये पेरण्यासाठी निघालेल्या गिरीश बनकर यांचे व्याख्यान नक्कीच नव्या पिढी साठी मार्गदर्शक ठरू लागले.हा जयंती सोहळा संपन्न होत असताना या कार्यक्रमास लोकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री गुरु रविदास मंदिर ट्रस्टचे विश्वस्त हरिचंद्र बबनराव डोईफोडे यांनी केलेले आहे.

# जोशी सरांच्या निधनाने सुसंस्कृत, प्रगल्भ नेतृत्व हरपले : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री आदरणीय मनोहर जोशी सरांच्या निधनाने सुसंस्कृत, प्रगल्भ नेतृत्व हरपले आहे. सरांच्या जाण्याने मोठी हानी झाली असून त्यांची उणीव सदैव भासणार आहे. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जोशी सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार शोक संदेशात म्हणतात की,' नगरसेवक, महापौर, राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष अशी विविध महत्वाची पदं भूषविणाऱ्या आदरणीय जोशी सरांचं व्यक्तिमत्व सर्वांसाठी प्रेरणादायी होते. शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहणारे आहे. व्यासंगी राजकारणी ही त्यांची ओळख सर्वशृत आहे. लोकशाहीचा पुरस्कार करणारे, विकासाचा ध्यास असणारे ते नेते होते. कोहिनूर सारख्या विविध संस्थांच्या माध्यमातून सरांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, सिंचनातील कृष्णा खोरे विकास महामंडळाची सुरुवातही, टॅंकरमुक्त महाराष्ट्र घोषणा, महाराष्ट्र भूषण पुरस्काराची सुरुवातही आदरणीय जोशी सरांच्या प्रयत्नाने झाली. लोकसभा अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. जोशी कुटुंबावर आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. जोशी कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना करतो. जोशी कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहे. मी आदरणीय जोशी सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# सार्वजनिक पुरवठाच्या विहिरीचे पाणी बेकायदेशीरपणे विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** सार्वजनिक पाणीपुरवठाच्या विहिरीचे पाणी बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्यावर योग्य ती चौकशी करून कार्यवाही करावी यासाठी दि. २१ रोजी चिकाळा येथील ग्रामस्थांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी हदगाव यांच्याकडे केली.

सविस्तर व्रत असे की हदगाव तालुक्यातील मौजे चिकाळा येथील नागरिकांसाठी शासकिय योजनेतून एकुण तिन विहिरीतील जलसाठा उपलब्ध आहे. मागील २५ वर्षापासुन ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी सार्वजनिक विहिरीतील पाणी परिसरातील शेतक-यांकडून आर्थिक तडजोड करुन शेजारील शेतकऱ्यांच्या पिकांना देत असल्याने संबंधीत शेतकयांच्या पिकांसाठी मुबलक प्रमानात जलसाठा राखीव ठेवण्यासाठी गावातील नागरीकाना अत्यंत अल्प प्रमाणात पाणी पुरवठा करीत असून संबंधीत कर्मचाऱ्यांस व सरपंच यांना या बाबत नागरीकांनी अनेक वेळी पाणी पुरवठा करण्यासाठी तोंडी विनंती केली होती.

विहिरीत पाणीच उपलब्ध नसल्याचे सांगितले नागरिकांच्या अत्यल्प पाणीपुरवठया बाबतच्या तक्रारी वाढल्याने दिनांकः १९.०२.२०२४ रोजी ग्रामसेवक, उपसरपंच माजी सरंपच व ग्रामपंचायत सदस्य आदिनी तिन्ही विहिरीवर जाऊन पाहणी केली. असता विहिरीत पुरेसा जलसाठा उपलब्ध असल्याचे दिसून आले. तसेच सदरील सार्वजनिक विहिरीतील पाणी विहिरीच्या भोवती असलेल्या पिकांना पाणी देण्यासाठी पाईप व मोटार बसविलेली दिसून आली. सदरील सार्वजनिक विहिरीचे बेकायदेशीरपणे पाणी घेणाऱ्या शेतक-यांस याबाबत विचारले असता त्याने दमदारी करीत आम्ही मागील २५ वर्षापासुन पाणी घेता, तुमच्याने जे होते ते करुन घ्या. इतके दिवस तुम्ही काय झोपले होते का ? म्हणून शिवीगाळ केली तसेच मारहाण करण्याची धमकी दिली आहे, असे निवेदनात नमुद आहे.



सार्वजनिक पाणीपुरवठाच्या विहिरीचे पाणी बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्यावर योग्य ती चौकशी करून कार्यवाही करावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल .**यादव मनपुरवे ,ग्रा . पं . सदस्य चिकाळा**

# अन् संभाजी भोसलेंची तलवार सपासप वार करू लागली

## राजे लखुजीराव जाधवराव यांचे पुत्र दत्ताजीराव व शहाजीराजे यांचे चुलत बंधु संभाजी भोसले यांच्या स्मृतिदिनानिमित्त

आधुनिक केसरी

**२३ फेब्रुवारी रोजी राजे लखुजीराव जाधवराव यांचे ज्येष्ठपुत्र दत्ताजीराव जाधवराव व शहाजीराजे यांचे चुलत बंधु संभाजी भोसले यांचा स्मृती दिन. राजे दत्ताजीराव जाधवराव व संभाजी भोसले यांचा मृत्यु २३ फेब्रुवारी १६२३ रोजी खंडागळे हत्तीप्रकरणात देवगिरीवर झाला. निजामशाही दरबारामध्ये खंडागळे नावाचा एक सरदार होता. दरबाराचे काम संपवून सर्व सरदार मंडळी आपापल्या घराकडे जाण्यास निघाले असता खंडागळे सरदारांचा हत्ती अचानकपणे बिथरला व वाटेत येईल त्याला बेफामपणे चिरडून तुडवू लागला. हत्तीवरती माहुत होता. तो हत्तीला आवरण्यासाठी प्रयत्न करत होता. पण तो बिथरलेला गजराजा लोकांना तुडवीत चित्कार करीत धावत होता. त्याने असा काही अवतार धारण केला होता की त्याला अडवण्याची कोणाची छाती होईना; त्या पिसाळलेल्या हत्तीचा रौद्रपणा दत्ताजी जाधवराव म्हणजे जिजाऊंचे भाऊ यांना सहन होईना. कारण हत्तीने जाधवरावांच्या अनेक स्वारांना घोड्यावरून उडवून दणादणा भुईवर आदळले व पायाखाली चिरडून मारले.**



दत्ताजीं जाधवरावांचे सैनिक हत्तीपुढे पराभूत झाले. हा पराभव दत्ताजी जाधवराव यांना खुप झोंबला. दत्ताजी जाधवराव हत्तीहून जास्त पिसाळले व हत्तीवरच धावून गेले. स्वतः दत्ताजी जाधवराव हत्तीशी सामना करू लागले. त्यांनी हत्तीवर वार करून त्याची सोंड धडावेगळे केली. खूप गर्दी व गोंधळ, धक्काबुक्की आणि रेटारेटी झाली. आपल्या हत्तीला वाचवण्यासाठी खंडागळे सरदार मध्ये पडले. यावेळी मालोजीराजांचे बंधू विठोजी भोसले व त्यांची दोन मुले संभाजी भोसले व खेळोजी भोसले खंडागळे यांच्या मदतीला धावून आले.
दत्ताजी जाधवरावांनी रागाच्या भरात आपला मोर्चा संभाजी भोसले यांच्याकडे वळवला .संभाजी भोसले यांची तलवार सपासप वार करू लागली. दोघांची खडाजंगी लढाई सुरू झाली. खडाखड एकमेकांवर घाव पडू लागले.दत्ताजी जाधवराव व संभाजी भोसले या दोघांची झटापट पाहून दोन्ही बाजूची मंडळी हत्यारे घेऊन धावली व एकच झुंबड उडाली. दोन्ही पक्षात अटीतटीची झुंज सुरू झाली. क्षणभरातच दत्ताजी जाधवराव व संभाजी भोसले एमेकावर तूटून पडले. हत्तीचे बिथरने बाजूलाच राहिले. जाधवराव व भोसले आपआपसात भांडू लागले. नाते-गोते विसरून एकमेकावर हत्यार चालवू लागले. हे पाहून एकमेकांचे सैनिकही एकमेकांवर हल्ला करू लागले.
दत्ताजी जाधवरावांनी सैनिकावर प्रतिहल्ला करून अनेक लोकांना ठार मारले. हे पाहून विठोजी भोसले यांचे पुत्र संभाजी भोसले यांनी दत्ताजी जाधवराव यांच्यावर हल्ला करून त्याचे शीर धडावेगळे केले. लखुजी जाधवराव त्यावेळी तेथे नव्हते.त्यांना व शहाजीराजांना हे वृत्त समजताच दोघेही माघारी फिरले. आपापल्या लोकात मिसळून एकमेकांच्यावर तुटून पडले. आपला पुत्र ठार झाल्याचे पाहून लखुजीराजे यांच्या डोळ्यात अंगार फुलला.भयानक ज्वालामुखी भडकला. संतापाने लखोजी जाधवराव लाल झाले. अंगाची लाही लाही झाली. त्यांच्या क्रोधाने अवघ्या दशदिशा शहारल्या. लखुजीराजे यांना समोर दिसले ते आपले जावई शहाजीराजे. प्रत्यक्ष जावई, लाडक्या लेकीचे कुंकू. कसली माया आणि कसली नाती. आपल्या पोटच्या गोळ्याचा अंत करणाऱ्याचा नायनाट करण्याकरता त्यांनी आपली तलवार उपसली.त्या रागातच त्यांनी संभाजी भोसले यांना ठार केले. आपला भाऊ वाचत नाही हे पाहून शहाजीराजे मध्ये पडले. परंतु लखुजी राजांनी संतापून जावई शहाजीराजे भोसले यांच्या दंडावर तलवारीने वार केला. झालेल्या जखमेने दंडातून भळाभळा रक्त वाहू लागले.त्याचा परिणाम होऊन शहाजीराजे बेशुद्ध पडले. शहाजीराजांच्या अंगरक्षकांनी त्यांना उचलून नेले. या घटनेने सारे आवाक झाले.सगळीकडे हाहाकार उडाला.

निजामशहा मलिक अंबर पर्यंत ही बातमी गेली. तेव्हा त्यांनी मध्ये पडून दोन्ही पक्षाला बाजूला सारून सर्व आपसातील भांडणे मिटवली. लखुजी जाधवरावांना असे वाटले की निजामशहाने शहाजीराजांची बाजू घेतली. लखुजीराजांनी या गैरसमजातून निजामशाहीचा धिक्कार करून पुन्हा मोगलांची नोकरी पत्करली. तसेही निजामशहाचा लखुजी राजांवर विश्वास नव्हता. निजामाने लखुजीराजांनाच दोष दिला.लखुजीराजे अत्यंत मुत्सद्दी, अनुभवी व वजनदार सरदार होते. ते रागापोटी मोगलांकडे निघून गेले. मोगलांनी त्यांना २४,००० स्वारांची मनसब आणि १५,००० घोडेस्वारांचा सरंजाम दिला.
मोगलांना दक्षिणेतील राजकारणात लखुजी राजांसारखा चांगला मोहरा मिळाल्याचा आनंद झाला. त्यामुळे त्यांनी आपल्याकडे लखुजीराजे यांची एकाद्या शहजादा प्रमाणे बडदास्त ठेवली गेली .लखोजीराजे जाधवरावांनाही आपल्या महत्वाकांक्षेची पूर्ती झाल्याचा अनुभव आला.पण या सर्व प्रकरणात जाधव-भोसले कुटुंबातील दोन जीव विनाकारण बळी गेले .या प्रकरणामुळे दोन्ही कुटुंबात तणावाचे वातावरण निर्माण झाले. एक तासापूर्वी कोणालाही कल्पना नव्हती की इथे असा काही भयंकर प्रकार घडेल.जाधवराव - भोसले यासाठी लग्नबंधनाने एकत्र आले होते का? ढाली - तलवारी घेऊन लढण्यासाठी ? आपल्या बायकांच्या कपाळाचे कुंकू रक्षणासाठी का पुसण्यासाठी ? भोसले संभाजीसाठी तर जाधवराव दत्ताजिकरीता अश्रू ढाळत बसले .जिजाऊंनी कोणासाठी रडावे भावासाठी की दिरासाठी.हत्ती आपसात झुंजले. जिजाऊंचे माहेर कायमचे परके झाले. भोसले जाधवराव कायमचे अंतरले .परंतु जिजाऊंनी सासर - माहेरच्या भांडणाचा राग आपल्या संसारावर अजिबात होऊ दिला नाही .

खंडागळे हत्ती प्रकरण अनपेक्षितपणे घडलेली घटना होती. या प्रकरणामुळे जाधव-भोसले कुटुंबात तणावाचे वातावरण तयार झाले पण ते फार काळ टिकले नाही. मलिक अंबरने मात्र वरील प्रकरणाचा फायदा घेऊन लखुजी जाधवरावांना मात्र कायमचे दूर केले .मलिक अंबर लखुजीराजे यांचा कायमचा द्वेष करत होता. शहाजीराजे व लखुजीराजे यांच्यामध्ये कायमचे वितुष्ट निर्माण करण्याचे निजामाचे प्रयत्न होते; पण त्यात त्याला फारसे यश आले नाही. आता काय म्हणायचे या दैवगतीला ? काय नाव द्यायचे ह्या यादवीला ? दत्ताजींच्या आणि संभाजीराजांच्या राण्यांचे ! दोघींच्याही भाळी वैधव्य आले. बांगड्या फुटल्या... कशासाठी ? काय कारण ?.. काही नाही ! काय तर म्हणे एक हत्ती बिथरला. पण म्हणून काय माणसाने एवढे बिथरायचे ? जाधवरावांच्या सिंदखेडराजा परिसरात मुख्य व स्वतंत्र विद्यमान वंशजशाखा जवळखेड , उमरद , रुसुमचे या असुन सिंदखेडराजा परिसरा व्यतिरिक्त यांच्या विद्यमान वंशजशाखा भुईंज (सातारा), करवंड, कन्हेरखेड, वडाळी व सारवडी या होत... दत्ताजी जाधवराव व संभाजी भोसले यांना स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा.

डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर पुणे

# रोटरी क्लबची समाजसेवेची दैदीप्यमान वाटचाल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या रोटरी इंटरनॅशनल च्या रोटरी डिस्ट्रिक्ट ३०६० अंतर्गत कार्यरत असलेल्या रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड ने गेल्या एकवीस वर्षांपासून समाजसेवेत विविध सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रेसर राहून स्वतः ला झोकून दिले आहे. रोटरी ने आजवर हाती घेतलेल्या विविध सामाजिक उपक्रमाचा हजारोंच्या संख्येने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष /अप्रत्यक्षपणे लाभ झाला आहे व होत आहे.
रोटरी ब्लड बँक, पॅथॉलॉजी लॅब, डायलिसिस सेंटर, फिजिओथेरपी सेंटर, रुग्णवाहिका हे रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस चे कायमस्वरूपी सुरू असलेले प्रकल्प असून गरजू रुग्णांना सदैव सवलतीच्या दरात या सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ५० बेडचे सुसज्ज आय सी यू रुग्णालयाचे लोकार्पण रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड तर्फे नुकतेच करण्यात आले आहे ज्यायोगे असंख्य गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात वैद्यकीय सेवेचा लाभ मिळू शकेल. रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस तर्फे गेल्या काही वर्षात अनेकविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. शासनाच्या वृक्षारोपण कार्यक्रमातील सहभाग, शिक्षक दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कार्यरत गुरुजनांचा नेशन बिल्डर अॅवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. साडेतीनशे टी बी रुग्णांना व गर्भवती महिलांना आवश्यकते नुसार प्रोटीन आहाराचा सहा महिने पुरवठा करण्यात आला. गरजू रुग्णांसाठी रेटीनोपथी व काचबिंदू शिबीराचे नुकतेच आयोजन करण्यात आले. शहरातील व जिल्ह्यातील उद्योजकांना व्यवसाय वृध्दींगत करण्यासाठी धुळे फेस्टिव्हल सारख्या व्यावसायिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. देशाच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थीनी यांना स्वतंत्रता रॅलीत संधी देऊन सन्मानित करण्यात आले.
अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळावे म्हणून आर ओ प्लॉंट उभारुन देण्यात आले. तसेच काही शाळांमधे मुलींसाठी स्वच्छता गृहांची निर्मिती करुन देण्यात आली. निकुंभे जिल्हा परिषदेच्या शाळेत वैज्ञानिक भिंत निर्मिती चे काम हाती घेतले आहे. शैक्षणिक उपक्रमा अंतर्गत काही शाळांना संगणक, प्रिंटर्स, डिजिटल स्मार्ट बोर्ड्स चा पुरवठा करण्यात आला. शासनाच्या जलसंधारण उपक्रमात देखील रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड ने सहभाग नोदवत धुळे तालुक्यातील आनंद ग्राम योजने अंतर्गत तलावाचा गाळ काढून उंची वाढवण्याचे व गळती थांबवण्याचे काम देखील हाती घेतले असून लवकरच पूर्णत्वास जात आहे. महिला सबलीकरण योजने अंतर्गत महिला व मुलींना नऊ वार साडी शिवण मोफत प्रशिक्षण शिबीर नुकतेच आयोजित करण्यात आले तसेच महिलांच्या आरोग्यासाठी मोफत कॅन्सर तपासणी, शिबीर आयोजित करण्यात आले. मतिमंद मुला मुलींच्या सहलीचे आयोजन करण्यात आले. आदिवासी व शेतमजूर यांच्या मुलांना थंडीच्या दिवसात स्वेटर्स वाटप करण्यात आले. रक्तदान व हिमोग्लोबीन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड च्या माध्यमातून गरजू दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम हात वितरण शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे, कमलाबाई शाळा चौकाचे सुशोभीकरण काम लवकरच हाती घेण्यात येत आहे व मातोश्री वृध्दाश्रम येथे फ्लोअर सुशोभीकरण, आरामदायी आसन व्यवस्था व पेयजल तसेच हॅंडवॉश स्टेशन ची निर्मिती नुकतीच करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स व तांत्रिक शिक्षणासाठी अद्ययावत व सुसज्ज आरोही सेतू व्हॅन चे देखील नुकतेच लोकार्पण करण्यात आले आहे. रोटरीच्या विविध सामाजिक उपक्रमात सातत्याने लोकांचा सहभाग लाभत असून तो उत्तरोत्तर वाढतोच आहे. भविष्यातही हा ओघ असाच वृध्दींगत होईल यात शंकाच नाही. या ठिकाणी उपस्थित निहीर दवे प्रांतपाल, दिपक अहिरे, मनोज चौधरी,सचिन बोरसे पदाधिकारी उपस्थित होते.




# नायगाव येथे पहिले महिला अधिवेशन १० मार्च रोजी जमणार सावित्रीच्या लेकी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्ण वर्षपूर्ती व सत्यशोधिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सत्यशोधक समाज महिला संघ यांच्या वतीने पहिले महिला अधिवेशन आयोजित करण्यात आलेले आहे.
हे अधिवेशन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जन्मभूमी असलेल्या खंडाळा तालुक्यातील नायगांव येथे घेण्यात येणार आहे. या अधिवेशनास महाराष्ट्रातून सावित्रीच्या लेकी येणार असून या अधिवेशनातून विचारमंथन घडणार आहे.
रविवार दि.१० मार्च २०२४ रोजी सकाळी ९ वाजता या अधिवेशनास ज्ञानदेवी सावित्रीमाई फुले सभा मंडप,जि.प.प्राथ. शाळेसमोर सुरुवात करण्यात येणार आहे. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी म्हणजेच शनिवार दि.९ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता अमरावती येथील वैशाली धाकुलकर यांचा मी सावित्री बोलतेय हा एक पात्री प्रयोग कार्यक्रम होणार आहे.रात्री ८ वाजून १५ मिनिटांनी "सावित्रीमाई फुले आजच्या महिलासाठी दिपस्तंभ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. रात्री ८.३० पासून भोजन असणार आहे. अधिवेशनाच्या दिवशी रविवार दि.१० मार्च २०२४ रोजी सकाळी ८.३० वाजता ह.भ.प.विजय महाराज भोईर रा.शिरूर यांचे सत्यशोधकीय किर्तन होणार आहे.तद्नंतर ९. ३० वाजता उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली ताई चाकणकर यांच्या हस्ते सत्यशोधक समाजाच्या



झेंडयाचे ध्वजारोहण होणार आहे. तसेच प्रमुख अतिथींचा सत्कार व मनोगत होणार आहे.वंदनाताई वनकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने उद्घाटन सत्राची समाप्ती करण्यात येणार आहे. तसेच ११:३० वाजता महिला गट चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. "प्राचीन भारताची क्रांतीकारी महिला कालांतराने गुलाम का झाली ?" या विषयावर महिलांमध्ये गट चर्चा करण्यात येणार आहे.या सत्राची अध्यक्षता छत्रपती संभाजीनगर येथील सुपरिचित व्याख्यात्या अॅड.वैशालीताई डोळस या करणार आहेत. अधिवेशनातील विविध ठराव पारीत केले जाणार आहेत. या सत्राच्या समाप्तीनंतर भोजन असणार आहे.या अधिवेशनात सूत्र संचालन, प्रास्ताविक,आभार तसेच प्रमुख अतिथी व वक्ते या सर्व भूमिका महिला पार पाडणार आहेत. या ऐतिहासिक पहिल्या सत्यशोधक समाजाच्या महिला अधिवेशनास जास्तीत जास्त महिला भगिनींनी सहभागी व्हावे व तन मन धनाने साथ सहयोग देऊन अधिवेशन यशस्वी करावे. अशी विनंती आयोजकांकडून करण्यात आलेली आहे.

# प्रदीप पाटलांचा चंद्रकांत दादांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** केशव स्मृती प्रतिष्ठान सेवा संस्थेत मागील १० वर्षा पासून श्री प्रदिप गोकुळ पाटील हे सेवा कार्य करीत आहेत, आठ वर्षा पासून समतोल प्रकल्पाची जबाबदारी त्यांच्या वर देण्यात आलेली आहे. ते समतोल प्रकल्पात व्यवस्थापक पदावर उल्लेखनीय कार्य करीत आहेत. या आठ वर्षात आतापर्यंत ३५४० रेल्वे स्टेशनवर भरकटलेल्या, भीक मागणाऱ्या, अनाथ, बेघर, नशा करणाऱ्या बालकांना समाजाच्या प्रवाहात आणून त्यांचा परिवार शोधून त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पुढे ही करीत आहेत. भुसावळ व जळगाव रेल्वे स्टेशनवर भिख मागणारे, नश्या करणारे कोणी ही लहान बालक दिसले की त्यांना विचारपूस करून त्यांना बालगृहात दाखल करून त्यांचे पुनर्वसन करणे , त्या बालकांना सपोर्ट करणाऱ्या टीम शी पंगा घेत त्या बालकांना चांगल्या मार्गावर आणण्याचे कार्य हे नेहमी करीत असतात. भारतातील काना कोपऱ्यातील



राज्यातील , जिल्यातील बालकांचा परिवाराचा शोध घेत त्यांनी त्या बालकांना सुरक्षित घरी परिवारात सोडले आहे. हे काम करत्या वेळेस अनेक वेळेस त्यांच्या वर बालकांनी हल्ले ही केलेली आहेत , पण न घाबरता जीवाची पर्वा न करता रात्रंदिवस वेळ , पैसा न पाहता ते सेवा देत आहेत . या सर्व कार्याची दखल घेत चंद्रकांत पाटील उच्च व तंत्र शिक्षण , वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री , महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रकांत दादा पाटील यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.



# पंतप्रधान मोदीकडून मातृशक्तीचा नेहमीच गौरव : बागडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे भारतीय जनता पार्टीच्या नारीशक्ती वंदन या कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल ऑरेंज फ्लॅग येथे अनुराधाताई चव्हाण यांनी केले होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.श्री. हरिभाऊ बागडे (नाना) हे उपस्थित होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात उपस्थित हजारो महिलांशी संवाद साधताना हरिभाऊ बागडे (नाना) म्हणाले की, मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी मातृ शक्तीचा नेहमीच गौरव करतात, आणि त्यांच्या गरजा बद्दल संवेदनशील असतात, आणि याच संवेदनेतून त्यांनी महिलांसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत, यावेळी त्यांनी महिलांसाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या विविध योजना त्यांची उपलब्धी याबाबत ही मा.श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी माहिती सांगितली, तर फुलंब्री तालुक्यातील विविध क्षेत्रात गौरव प्राप्त केलेल्या अनेक महिलांचा नामोल्लेख करत त्यांचा गौरव केला. **येवढा वनवास सीताबाई एकलीला ! वाटून देला बाई घरोघरीच्या नारीला !!** अशा अनेक रामायणा संदर्भातील ओव्या म्हणत उपस्थित महिलांना त्यांनी मंत्रमुग्ध केलं, तर कार्यक्रमाच्या आयोजक सौ.अनुराधाताई अतुल चव्हाण यांनी आपण महिला सक्षमीकरणासाठी कायम कार्यरत असून यापुढे ही कायम कार्यरत राहणार असल्याचे आपल्या प्रास्ताविक प्रसंगी सांगितले. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, कृ.उ.बाजार समिती सभापती अनुराधाताई चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष पुष्पाताई काळे, भाजपा तालुकाध्यक्ष सांडू आन्ना जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल पाथरे, तारु आप्पा मेटे, नरेंद्र देशमुख, मंगलाताई वाहेगावकर , माजी सभापती सविताताई फुके, ऐश्वर्या गाडेकर, महिला आघाडी तालुकाध्यक्ष सविता नवले, यांच्यासह तालुका भरातील हजारो महिला या नारी शक्ती वंदन अभियानास उपस्थित होत्या.

## रेलनावडी सोसायटीवर वाळुंजे यांचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील रेलनावडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षा हिराबाई वाळुंजे या चेअरमण पदी विराजमान होत्या मात्र त्यांच्या विरोधात विरोधकांनी अविश्वास दाखवल्याने अविश्वास ठराव पारित केला मात्र अविश्वास ठराव आयोजित सभेत एकही सदस्य उपस्थित न राहिल्याने अविश्वास ठराव फेटाळण्यात आला. सोसायटीच्या अध्यक्षा हिराबाई रंगनाथ वाळुंजे यांच्या विरोधात ११ पैकी ७ सदस्यांनी ६ फेब्रुवारी रोजी अविश्वास ठराव दुय्यम निबंधक यांच्याकडे दाखल केला होता. त्यावर चर्चा करण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी दुपारी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या सभेसाठी अकरापैकी एकही सदस्य उपस्थित राहिला नसल्यामुळे हा ठराव फेटाळण्यात आला. यामुळे रेल नावडी सोसायटीवर वाळुंगे यांचं पुन्हा व्हाट्सअप वर दिसून येत आहे.

## शिर्डीच्या पर्यटन व्यवसायाला हेलिकॉप्टर सफरीची जोड

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** हेलिकॉप्टरमध्ये बसणे तसे सर्व सामान्य माणसाच्या आवाक्यात नसते मात्र पर्यटन व्यवसायातील विजय जेजुरकर यांनी अवघ्या ४९९९ रुपयांत सफरीची संधी साईभक्त व स्थानिक नागरिकासाठी उपलब्ध करून दिली असून या सेवेस चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती विजय जेजुरकर यांनी दिली आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल जवळ असलेल्या हेलीपॅडवर हि सुविधा उपलब्ध आहे सर्व सामान्य माणसाला देखील या सेवेचा लाभ मिळाला पाहिजे हा दूरदृष्टीकोन ठेवत साईबाबा एव्हिएशन या कंपनीने हि सेवा नुकतीच सुरू केली आहे मिळत असलेल्या प्रतिसादा बद्दल जेजुरकर म्हणाले की ज्या वर्गाचे उत्पन्न कमी आहे असे कुटुंब समोर ठेवून आतिशय कमी दर ठेवून हि सेवा नुकतीच सुरू करण्यात आली असून आपल्या भागात हा पहिलाच प्रयोग आहे परंतु त्यास चांगला प्रतिसाद मिळत असून राहता कोपरगाव तालुक्यातील अनेकांनी याचा आनंद घेतला आहे.

विजय जेजुरकर हे देखील मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्याने आतिशय माफक दर ठेवण्यात आले आहे यामुळे शिर्डी शहराच्या पर्यटन व्यवसायाला एक प्रकारे नवीन ओळख यामुळे मिळणार आहे एका वेळी सहा प्रवाशी बसु शकतात दहा पंधरा मिनिटाची हि हवाई सफर वेगळा असा आंनद देणारी ठरत आहे तिनशे स्त्री पुरुष महिला तरुण पत्रकार व्यावसायिक उद्योजक यांनी याचा लाभ घेतला आहे शिर्डी येथे आलेल्या साईभक्त भाविकांना पुणे मुंबई हि सेवा सुरू आहे मात्र पाच हजार रुपये खर्च करु शकतील अशा वर्गातील लोकांना सफरीचा आंनद मिळाला पाहिजे हा मुख्य हेतू आहे व त्यास प्रतिसाद देखील चांगला



मिळत आहे गोवा मुंबई पुणे पाठोपाठ आता शिर्डी येथे ही सेवा सुरू झाल्याने साईभक्त भाविकांन मध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे शिर्डी येथे सुरू झालेल्या हेलिकॉप्टर सफरीची संधी शिर्डीत पर्यटन व्यवसायासाठी आकर्षणाचे केन्द्र बिदु ठरेल असा विश्वास ज्यानी सफर केली आहे त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.



## माजी सरपंच विलास व्हटकर यांच्या प्रयत्नातून मंजूर सायकलींचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे माजी सरपंच विलास व्हटकर यांच्या प्रयत्नातून धाराशिव जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व महिला-बालकल्याण विभागाकडून मुलींसाठी मंजूर झालेल्या सायकलींचे गुरुवार (दि.२२) येथील आर्यसमाज मंदिरात शिवसेना नेते केशव उर्फ बाबा पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच शंकरराव पाटील होते. तर कार्यक्रमासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी उपजिल्हाप्रमुख बसवराज वरनाळे, उमरगा तालुकाप्रमुख बाबुराव शहापुरे, उमरगा-लोहारा विधासभाप्रमुख भगवान जाधव, उमरगा बालविकास प्रकल्प अधिकारी देवानंद वाघ, विस्तार अधिकारी आर. आर. सोनकांबळे, उमरगा शहरप्रमुख राजेंद्र सुरवसे, उमरगाचे माजी नगराध्यक्ष रज्जाक अत्तार उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सिद्धाराम हत्तरगे, माजी तालुकाप्रमुख विजयकुमार नागणे, जेष्ठ शिवसैनिक डी. के. माने सर, गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर, सोशल मीडिया तालुकाप्रमुख दत्तात्रय शिंदे, गुंजोटी विभागप्रमुख संगमेश्वर स्वामी, येणेगुर शाखाप्रमुख आकाशराजे कांबळे, गुंजोटी शाखाप्रमुख विजय शिंदे, श्रीकृष्ण विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एन. बुदले, सहशिक्षक खंडू म्हेत्रे, तंटामुक्त समिती अध्यक्ष चनप्पा माळगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक म्हाळप्पा दूधभाते, आर्यसमाज मंत्री विश्वनाथ कदेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. विलास व्हटकर यांच्या प्रयत्नातून गेल्या पाच वर्षात गुंजोटी परिसरातील गुंजोटी, गुंजोटीवाडी, औराद, निशारी तांडा, महाराणा प्रतापनगर तांडा, कसगी, कसगीवाडी, मुरळी, कदेर, भुसनी, पळसगाव, नागराळ, एकोंडी या परिसरातील साडे तीनशेच्या वर मुलींना सायकलींचा लाभ मिळाला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष दूधभाते, सुरेश दूधभाते, विक्रम व्हटकर, हिरा जेटीथोर, सतीश लवटे, विशाल देशमुख, महावीर दूधभाते, विशाल व्हटकर, केशव कांबळे, कार्तिक घाटे, विजय जाधव, सचिन शिंदे यांनी पुढाकार घेतला. संगमेश्वर स्वामी यांनी सूत्रसंचालन केले तर आभार तन्मय शेटगार यांनी मानले. या मुलींना मिळाला सायकलीचा लाभः अवंतीका जाधव, लक्ष्मी कांबळे, वैष्णवी दूधभाते, श्वेता हत्तीकाळे, प्रतीक्षा घाटे, रोहिणी जेटीथोर, सृष्टी लवटे, साईराणी व्हटकर, अश्विनी शिंदे, आयेशा शेख.

## गावातील पाणी स्त्रोत बळकट करण्यासाठी वैजापूर येथे जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** ग्रामीण भागात गावातील पाण्याचे स्त्रोत शाश्वत स्वरूपात निर्माण करून बळकट करण्यासाठी जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन टप्पा 2, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार व जलयुक्त शिवार या योजना विषयी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून जल रथाच्या माध्यमातून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

यासाठी संभाजीनगर जिल्ह्यातील 9 तालुक्यासाठी तयार करण्यात आलेल्या जलरथांपैकी वैजापूर येथील जलरथाचा शुभारंभ वैजापूर चे मा.नगराध्यक्ष डॉ.दिनेशभाऊ परदेशी, वैजापूर मर्चंट बँकेचे मा.चेअरमन विशालशेठ संचेती, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रुपेश संचेती, मा.चेअरमन हेमंतकुमार संचेती, वैजापूर तालुका किराणा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशचंद बोथरा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्रकुमार पारख, प्रफुलकुमार संचेती, भाजप शहराध्यक्ष दिनेश राजपूत, जिल्हा सरचिटणीस शैलेश पोंदे, भाजप चे जिल्हा उपअध्यक्ष प्रेम राजपूत, गिरीश चापानेरकर, सन्मित खनिजो, नगरसेवक गणेश खैरे, गोकुळ भुजबळ, बजरंग मगर, विनय संचेती, भाजप महिला जिल्हाध्यक्षा जयमालाताई वाघ, पवारताई, भारतीय जैन संघटना मराठवाडा उपाध्यक्ष निलेशकुमार पारख, परेश संचेती, सुनंदीलाल बोथरा, सागर संचेती, हेमंत हिरण, मनेष संचेती, परिश कोठारी, दिपक सारडा, किरण सारडा, सुरेंद्र संचेती, जैन जागृती पाठशाळेचे राजेंद्र संचेती, हिंदवी स्वराज्य ग्रुपचे प्रवीण कोतकर, विक्रम अग्रवाल, दिपक काकडे, पंचायत समितीचे राहणे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून राज्यातील 34 जिल्ह्यातील 351 तालुक्यातील गावांमध्ये ऑडिओ जिंगल्स, पोस्टर्स, पॉम्प्लेट द्वारे प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे.गावातील जलस्त्रोत, तलावातील गाळ काढण्याची मागणी सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थांना शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात येईल.



# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## सातारा जिल्हाध्यक्ष प्रभाकर नेवसे यांची माहीती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली अनेक दिवसांपासून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असलेल्या विविध मागण्या समोर येऊ लागलेल्या आहेत.परंतु या मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामपंचायत कर्मचारी आता आक्रमक झालेले आहेत.महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेनेच्या वतीने काम बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायत कर्मचारी हे एकवटलेले असून दिनांक २६ फेब्रुवारी ते २९ फेब्रुवारी या दरम्यान काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. हे आंदोलन साताऱ्यात सुद्धा करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर नेवसे यांनी दिली.हे आंदोलन सातारा जिल्हा परिषदेमध्ये २६ ते २९ फेब्रुवारी या दरम्यान होणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि काम बंद बाबत सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुद्धा कर्मचाऱ्यांकडून निवेदन देण्यात आलेले आहे.



ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्याप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे,ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागु करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन अनुदानासाठी लादलेली वसुलीची अट पुर्णता रद्द करणेबाबत,माहे ऑगस्ट २०२० ते मार्च २०२२ पर्यंतचा थकीत वेतन तात्काळ अदा करणे यासारख्या प्रमुख मागण्या पूर्ण करण्यात यावे.म्हणून आंदोलन करण्यात येणार आहे.

आपल्या प्रलंबित मागण्या शासनाकडे बरेच वर्षांपासून प्रलंबित आहेत.त्यामुळे आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कामबंद आंदोलनात सर्व कर्मचाऱ्यांनी सहभागी होणे आवश्यक असल्याचे म्हटले जात आहे.पाणीपुरवठा, वीजपुरवठा,वसुली, सफाई, पाणी शुद्धीकरण इत्यादी कामे सर्व ग्रामपंचायत स्तरावर बंद ठेवण्यात यावे.असे आवाहन करण्यात आलेले आहे.या आंदोलनात कर्मचारी पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे. असे आवाहन कामगार सेनेचे राज्य अध्यक्ष विलास कुमरवार,उपाध्यक्ष राजन लिंगाडे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर नेवसे,फलटण तालुका सचिव रंजीत वरखडे,वाई कार्याध्यक्ष रमेश भोसले, उपाध्यक्ष गणपत फडतरे,सहसचिव सोमनाथ भगत,फलटण तालुकाध्यक्ष सचिन मोरे, वर्षा जाधव,प्रसिद्धी प्रमुख जेके काळे यांनी केलेले आहे.

# दहावीच्या विद्यार्थिनीवर जंगलात नेऊन बलात्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ज्या स्कूलबसमधून मुलगी शाळेत जात होती, त्याच स्कूलबसवरील चालकाचा मित्र असलेल्या युवकाने दहाविच्या विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला रात्रीच्या सुमारास जंगलात नेऊन बलात्कार केला. या प्रकरणी मुलीच्या तक्रारीवरून वाठोडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. श्याम उर्फ बिट्टू प्रशांत बेलखोडे (२४) रा. जलारामनगर, खरबी रोड, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पीडित १५ वर्षीय मुलगी ही दहावीची विद्यार्थिनी आहे. बिट्टू हा ड्रायव्हरचे काम करतो. बिट्टूचा एक मित्र स्कूल बस चालवतो. त्याच्या बसमधून पीडित मुलगी शाळेत येणे-जाणे करीत होती. बिट्टू हा नेहमी स्कूलबसवर मित्रासोबत येत होता. या दरम्यान तिची बिट्टूशी ओळख झाली. बिट्टू नेहमी तिच्याशी गोड-गोड बोलत होता. दरम्यान, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. १९ जानेवारीला बिट्टूने मुलीला पाणीपुरी खाण्यासाठी हसनबाग परिसरात बोलावले.रात्री ८ वाजताच्या सुमारास ती त्याला भेटण्यासाठी हसनबाग परिसरात गेली. तेथून बिट्टू तिला दुचाकीवर बसवून वाठोडा कुलर कंपनीजवळील जंगलात निर्जनस्थळावर घेऊन गेला. तेथे त्याने तिच्याशी बळजबरी शारीरिक संबंध ठेवले. याबाबत वाच्यता केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरामुळे मुलगी घाबरलेली होती. तिचा स्वभाव बदलला होता. ती कोणाशीच बोलत नव्हती. मुलीची ही अवस्था पाहून आईने तिला विश्वासात घेत विचारपूस केली. तिने बिट्टूने जबरीने लैंगिक अत्याचार केल्याचे सांगितले. वाठोडा पोलिसात घटनेची तक्रार करण्यात आली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून बिट्टूला अटक केली.


# इंडो-आयरिश हॉस्पिटलचे नितीन गडकरी यांच्या हस्ते २६ फेब्रुवारी रोजी लोकार्पण


## अत्याधुनिक आरोग्यसेवेला विश्वास व सामाजिक बांधिलकीची जोड देणार : डॉ. दिलीप जोंधळे

आधुनिक केसरी न्यूज




**अहमदनगर :** येथील इंडो-आयरीश जनरल अँण्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा २६ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता केंद्रीय दळणवळणमंत्री ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती डॉ दिलीप जोंधळे यांनी दिली.







या सोहळ्यासाठी जिल्हाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खा.डॉ.सुजय विखे पाटील, आ.संग्राम भय्या जगताप, मा. मंत्री आ.बबनराव पाचपुते, मा. मंत्री शिवाजीराव कर्डिले, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलिस अधीक्षक राकेश ओला, जि.प.चे सीईओ आशिष येरेकर, मनपा आयुक्त डॉ.पंकज जावळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अत्याधुनिक आरोग्यसेवेला सामाजिक बांधिलकीची जोड देत आरोग्यसंपन्न, आनंदी समाजाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने या हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. आयर्लंड येथे तब्बल ३३ वर्षे वैद्यकीय सेवा देणारे डॉ.दिलीप जोंधळे हे मूळचे संगमनेर आश्वी येथील, त्यांनी बी.जे.मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस आणि एम.डी. (मेडिसीन) केले व १९८९ मध्ये आयर्लंड येथे वैद्यकीय प्रॅक्टिस सुरू करून आंतरराष्ट्रीय दर्जाची वैद्यकीय सेवा देत मोठा नावलौकिक मिळवला. वडील स्व. शिवाजीराव जोंधळे गुरुजी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी नगरमध्ये प्रशस्त हॉस्पिटलची उभारणी करण्यात आल्याचे जोंधळे यांनी या वेळी आवर्जून सांगितले. पत्नी डॉ. वसुधा जोंधळे यांचे माहेर लोणी येथील असून. त्यांनी एमबीबीएस केल्यानंतर आयर्लंड येथे डीसीएच केले व ५५ बेडचे ज्येष्ठ नागरिक केअर सेंटर यशस्वी रीतीने चालवतात. याच धर्तीवर आता नगरमध्येही इंडो आयरिश हॉस्पिटलमध्ये ज्येष्ठांसाठी सेंटर सुरु करण्यात येणार आहे. मधुमेहानंतरच्या हृदयरोग, किडनी विकार, गँगरीन सारख्या गुंतागुंतीच्या समस्यांना प्रतिबंध करण्यासाठी डायबेटिक डे केअर सेंटर सुरु करण्यात येणार आहे. उतारवयातील स्मृतीभ्रंशासारख्या समस्यांवरही विशेष उपचार बरोबरच, हाडे ठिसूळ होतात. यावर बोन डेन्सिटीसारख्या तपासण्या करून वृध्दांवर उपचार केले जातील. तपोवन रोडवर ६ एकर जागेत ९० हजार स्क्वेअर फूटचे सहा मजली प्रशस्त असे इंडो आयरिश हॉस्पिटल जनतेच्या सेवेसाठी सज्ज आहे. यामध्ये १७० बेडस असून ५० बेडचा सुसज्ज आयसीयू आहे. बालरूग्ण तसेच नवजात शिशुंसाठी आयसीयू बेडची स्वतंत्र व्यवस्था आहे. हॉस्पिटलमध्ये जनरल मेडिसीन, मधुमेह, वृध्दापकाळ, कार्डिओलॉजी, मूत्रविकार, स्त्रीरोग, वंध्यत्व निवारण, बालरोग, नवजात शिशु, अस्थिरोग, जनरल सर्जरी, कान,नाक,घसा, फिजिओथेरपी, फार्मसी, रेडिओलॉजी, स्वतःचा अत्याधुनिक पॅथोलॉजी तपासणी विभाग आहेत. पक्षाघात, मेंदू शस्त्रक्रिया, शारीरीक दुखापत, हार्ट सर्जरी झालेल्या रूग्णांसाठी रिहॅबिलिटेशन सेंटरही येथे असणार आहे. उच्च दर्जाची कार्डियाक कॅथलॅब, ऑर्थोपेडिक, जनरल सर्जरी, डोळे, कान, नाक, घसा, दुर्बिणीव्दारे शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र सर्जिकल ऑपरेशन थिएटर हॉस्पिटलमध्ये आहे. एक मजला पूर्णतः आई व बाळासाठी असेल. डिलिव्हरीवेळी महिलांना बी.पी.वाढणे, मिरगी येणे असे प्रकार होतात. यासाठी स्वतंत्र ऑपरेशन थिएटर व संलग्न आयसीयुची व्यवस्था आहे. शस्त्रक्रियेनंतर रूग्णाला इतर त्रास होऊ नये यासाठी पोस्ट सर्जिकल आयसीयुचीही व्यवस्था हॉस्पिटलमध्ये आहे. १२ बेडचे सुसज्ज डायलेसिस विभागही कार्यान्वीत आहे. सीटी स्कॅन, सोनोग्राफी, एक्स रे, डायलेसिस सेंटर, सुसज्ज ऑपरेशन थिएटर अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. महिलांच्या स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. त्यादृष्टीने वेळीच प्रतिबंध होण्यासाठी मॅमोग्राफी तपासणी व उपचार सुविधा देण्यात येणार आहे. प्रदीर्घ अनुभव असलेले लिव्हर ट्रान्स्प्लांट तज्ज्ञ डॉ.मनोज डोंगरे हॉस्पिटलमध्ये रूग्णसेवा देणार आहेत. तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची मोठी टिम हॉस्पिटलमध्ये आहे. यात संचालक डॉ.दिलीप जोंधळे, डॉ.वसुधा जोंधळे यांच्यासह डॉ. सुहास जाधव, डॉ. शिबानी जोंधळे, डॉ. दिग्विजय जोंधळे, डॉ. विक्रांत काळे, डॉ. श्वेता काळे, डॉ. प्रशांत काळे, डॉ. मिनल काळे, डॉ. दीपक नाईकवाडे, डॉ. मिलिंद कोरडे, डॉ. प्रदीप कंठाळी, डॉ. प्रतिभा पवार, डॉ. गणेश मिसाळ, डॉ. शरद गारुडकर, डॉ.योगिता पवार, डॉ. कोमल लड्डा, डॉ.वेदांत लड्डा, डॉ. किशोर गाढवे, डॉ.भावना गाढवे, डॉ. सुहास घुले, डॉ.स्वाती घुले, डॉ.बाबा शिंदे, डॉ. दिलीप पडघन, डॉ.सिंधू पडघन, डॉ. अस्मिता डोंगरे, डॉ.साईप्रसाद शिंदे यांचा समावेश आहे. हॉस्पिटलमध्ये २०० जणांचा प्रशिक्षित स्टाफ असून अद्ययावत नर्सिंग कॉलेजही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहून आमच्या कार्याला शुभेच्छा व आशीर्वाद द्यावेत अशी विनंती यशवंत पाटील यांनी केली आहे.



# भावी डॉक्टरांनी साकारले गड-किल्ले

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** हिंदवी स्वराज्याची शान रायगड, अभेद्य मुरुड-जंजिरा ,अद्भुत व सुंदर राजगड, प्रतापगड, सह्याद्रीचा राजा सिंहगड असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारे गड, किल्ले आडगावच्या मविप्र संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानावर भावी डॉक्टरांनी त्यांच्या हातानी उभे केले. निमित्त होते ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे आणि किल्ले बनवा स्पर्धेचे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली किल्ले व ऐतिहासिक संस्कृतीचे महत्त्व समजावे व अभ्यास व्हावा, पूर्वजांच्या पराक्रमाच्या स्मृती जागृत रहाव्यात या हेतूने आडगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ-वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय येथे एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांची 'किल्ले बनवा' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे व कार्यकारिणी मंडळाच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम पार पडले. या शिवजयंती उत्सवाचा एक उपक्रम म्हणून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी मविप्र संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ- ज्ञानेश्वर लोखंडे , अधिष्ठाता डॉ- सुधीर भामरे , प्रा. मिलिंद देशपांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन केले तसेच आरती झाली आणि छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या भव्य बॅनरचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

या निमित्ताने सुप्रसिद्ध शिवचरित्रकार प्रा.सोपान वाटपाडे यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले. प्रथम वर्ष एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी 'आग्र्याहून सुटका' ही लघु नाटिका सादर केली. किल्ले बनवा स्पर्धेचा निकाल यावेळी जाहीर करण्यात आला. प्रथम वर्ष एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या ग्रुपच्या वतीने हे किल्ले बनवण्यात आले होते. यामध्ये प्रथम- प्रतापगड, द्वितीय- राजगड आणि तृतीय- पद्मदुर्ग या किल्ल्यांना पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत एकूण 11 किल्ले बनविण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना शिक्षणाधिकारी डॉ-ज्ञानेश्वर लोखंडे यांनी सांगितले की , छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या प्रमाणे स्वराज्यात रयतेचे आणि गड , दुर्ग , किल्ल्यांचे संरक्षण करत काळजी घेतली तशीच काळजी वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांनी रुग्णांची घेऊन संशोधनाच्या आधारे सदृढ आरोग्याचे सुराज्य अबाधित ठेवावे. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या गडकिल्ल्यांच्या प्रतिकृतींचे त्यांनी कौतुक केले. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित किल्ले बनवा स्पर्धेची पाहणी आणि परीक्षण डॉ- ज्ञानेश्वर लोखंडे , अधिष्ठाता डॉ-सुधीर भामरे , प्रा. मिलिंद देशपांडे यांनी केले.

कार्यक्रमासाठी डॉ. सतीश वाघमारे, क्रीडा संचालक प्रा. दिलीप गायकवाड, पंकज मुळाणे, तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मतदार जनजागृतीकरीता आज मॅरेथॉन रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 करीता SVEEP कार्यक्रमांतर्गत लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता 18 वर्षे पूर्ण व 18 वर्षावरील सर्व स्त्री-पुरुषाकरीता मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मॅरेथॉन रॅलीचे घोषवाक्य "माझे मत माझा अधिकार", "होय मी मतदान करणारच, आपण सगळे मतदान करूया" "लोकशाहीला बळकट करूया" या घोषवाक्यासह दि.24 फेब्रुवारी रोजी सकाळी 6:15 वाजता चांदा क्लब ग्राउंड येथून सदर मॅरेथॉन रॅलीला सुरुवात होत आहे.

सदर रॅली चांदा क्लब पासून- पाण्याची टाकी- आझाद बगीचा चौक- गिरनार चौक- समाधी वार्ड- पठाणपुरा चौक ते परत गांधी चौक- छोटा बाजार- जटपुरा गेट- रामनगर ते परत चांदा क्लब येथे समाप्त होईल.

मतदार जनजागृती करीता सदर मॅरेथॉन रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रणजीत यादव यांनी केले आहे.

# बल्हारशहात संभाजी ब्रिगेडतर्फे शिवजन्मोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**बल्हारशाह :** संभाजी ब्रिगेड बल्हारशाह शहरात शिवजन्मोत्सव सोहळा गेल्या दोन दशकांपासून साजरा करीत आहे. यंदाही शिवजन्मोत्सव साजरा करण्याचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून आला. १९ फेब्रुवारीला सकाळी ९ वाजता मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंह विद्यार्थी परिषद आणि संभाजी ब्रिगेड च्या सर्व कार्यकर्त्यांनी नगर पालिकास्थित शिवस्मारकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. या प्रसंगी धम्मपाल मुन यांच्या नेतृत्वात सह्याद्री ढोल ताशा पथकातर्फे ढोल ताशा चे सुरेख वादन करण्यात आले. आणि संध्याकाळी छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समिती तर्फे शोभायात्रा काढण्यात आली.

दि. २० फेब्रुवारी रोजी झाशी राणी चौकात पवनपाल महाराजांचे प्रबोधनपर किर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला उद्घाटक म्हणुन लाभलेले शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांनी शिवरायांचा सर्वसमावेशक मानवतावादी दृष्टिकोन आज अंगिकारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रा. दिलिप चौधरी यांनी शिवरायांच्या शेतीविषयक आणि रोजगाराभिमुख केलेल्या भरीव कार्याची माहिती सांगताना आज अशा लोकाभिमुख धोरण राबविल्याशिवाय देशाचा उद्धार शक्य नसल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चेतन खुटेमाटे यांनी शिवरायांनी केलेले लोकाभिमुख कार्य आणि समतेने, ममतेने चालविलेल्या राज्यामुळे आज ३५० वर्षानंतर आजही ते जनतेच्या हृदयात विराजमान असल्याचे मांडले. या प्रसंगी संभाजी ब्रिगेडचे दिवंगत कार्यकर्ते चंद्रशेखर भेंडारकर यांचा मरणोपरांत सन्मान करीत कुणाल क्षीरसागर यांनी त्यांच्या गौरवार्थ स्मृतीपुष्प वाचन केले. यानंतर झालेल्या किर्तनात शेकडोंच्या संख्येने उपस्थित असलेली जनता पवनपाल महाराजांच्या किर्तनाने मंत्रमुग्ध झाली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणय वाटेकर, सूत्रसंचालन रोहित चुटे आभार प्रदर्शन पवन राजगडे यांनी केले. जनतेने शिवजन्मोत्सव सोहळ्याला दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल अध्यक्ष साहिल घिवे, सचिव प्रतिक वाटेकर आणि वार्ड शाखा अध्यक्ष सुभाष पोटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. हा शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी संकेत चौधरी यांच्या नेतृत्वात गणेश मसराम, निखिल वडस्कर, निलेश सुर, चेतन मुळे, हर्ष नागरकर, प्रणय कष्टी, प्रज्वल गौरकार, ज्ञानेश्वर गहुकर, अनिकेत गजभिये, दीप आत्राम, दिवांशू पोटे, अमोल आडे, प्रनील नवघरे, ओम जमदाळे, संकुल झाडे, मयूर पोडे, अक्षय पप्पुलवार, शिवा कोतपल्लीवार आणि इतर सर्व संभाजी ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिक्षकांनी सत्याच्या मार्गाने चालावे

## डॉ. राजशेखर सोलापूरे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज




**पैठण :** श्री नाथ अध्यापक (बी.एड्) महाविद्यालय, पैठण येथे ICSSR (WRC) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अ‍ॅकॅडमीक लीडरशिप, गव्हर्नन्स अँड मॅनेजमेंट या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. राजशेखर सोलापूरे यांनी सॉक्रिटिस, प्लेटो ऑरिस्टॉटल पासून तत्वचिंतकांची फळी कशी निर्माण झाली निर्माण झाली यावर भाष्य करताना सत्यता दाखवताना कसा छळ होतो यावर भाष्य केले. आज आपण नेतृत्व या संकल्पनेकडे पाहताना केवळ राजकीय नेतृत्वाकडेच पाहत असतो, परंतु त्या राजकीय नेतृत्वाच्या पलीकडे जाणारे नेतृत्व म्हणजे शैक्षणिक नेतृत्व ही असते. समाजाला दिशा देण्यासाठी केवळ राजकीय नेतृत्व उपयुक्त नाही तर त्यात शैक्षणिक नेतृत्व हे अत्यंत महत्त्वाचे असते अशी महत्वाची टिप्पणी करून शिक्षकाचे काम हे सत्याचा मार्ग दाखवण्याचे काम आहे त्यामुळे शिक्षकाने सत्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे परंतु सध्याच्या सामाजिक वातावरणात शिक्षक हे भीतीच्या वातावरणात काम करताना दिसून येतात. त्यामुळे शिक्षकांनी सत्याचा मार्ग निवडला पाहिजे असे परखड मत व्यक्त केले.

या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक व व्याख्याते डॉ. राजशेखर सोलपुरे यांच्या हस्ते संपन्न झाले तर प्रमुख पाहुणे म्हणून तुषारभाऊ शिसोदे, कोषाध्यक्ष विवेकानंद शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. या राष्ट्रीय परिषदेसाठी बिजभाषक म्हणून प्राचार्य डॉ. मीना कुटे सिलवासा, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ समाधान दांडगे हे उपस्थित होते. या परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, अभ्यास मंडळाचे सदस्य, तसेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व आजी-माजी पदाधिकारी, तसेच विद्यापीठ व उपकेंद्र शिक्षणशास्त्र विभागातील सर्व सन्माननीय प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भारती महेर प्रस्ताविक डॉ. बालासाहेब किलचे आभार प्रदर्शन डॉ. वैशाली रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. देविदास शिंदे, डॉ.संघमित्रा गावंडे, डॉ. कल्पना गायकवाड आणि बी.एड प्रशिक्षणार्थ्यांनी सहकार्य केले.

# घोडेगाव येथे शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत करणारे, रयतेच्या राज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारे लोककल्याणकारी शासनकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. खुलताबाद तालुक्यातील घोडेगाव येथे आज दिनांक 19/02/2024 रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.साईनाथ पाटील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय , सद्‌गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय घोडेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.साईनाथ पा जाधव, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.






# विद्यार्थ्यांनी दिले जिल्हा परिषद प्रशालेस अहुजा कंपनीचे स्पीकर साऊंड सिस्टम भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ता. खुलताबाद येथील जिल्हा परिषद प्रशाला या प्रशालेचे 1987 सालचे दहावी बॅचचे विद्यार्थी या विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्रशालेस या ठिकाणी अहुजा कंपनीचे स्पीकर साऊंड सिस्टम हे भेट दिले असून आपण याच शाळेत शिकलो या शाळेतून घडलो आणि या ठिकाणी आता जिल्हा परिषद प्रशालेची आदर्श शाळा होणार असून भव्य अशी इमारत उभी राहणार आहे सध्या स्थितीत जिल्हा परिषद शाळा सुरू आहे या शाळेतुन आणखी अशाच प्रकारे चांगले विद्यार्थी घडो आणि त्यासाठी जे काही आपल्याकडून भेट देता येईल असे प्रत्येक बॅचेसचे विद्यार्थी करतात त्यापैकीच १९८७ सालचे दहावीची बॅच असलेल्या विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्रशालेस साऊंड भेट दिले विद्यार्थी व शाळेसाठी याचा उपयोग विविध प्रकारचे सांस्कृतिक व इतर कार्यक्रमांसाठी होईल. त्याबद्दल सध्याचे मुख्याध्यापक दहिफळे शिक्षक परदेशी , खंडाळे, पटेल, गौड, जैस्वाल आदी शिक्षक वृंद यांनी त्यांचे आभार व्यक्त केले तसेच यावेळी भेट देणारे दहावीचे विद्यार्थी सुधाकर औटे,अजिनाथ नलावडे ,बनसोड सर ,निकम ,संजय गायकवाड , संताराम गायकवाड अजय जैन, भाऊसाहेब नलावडे आदी उपस्थित होते.

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे विदर्भाच्या प्रवेशद्वार असलेल्या देऊळगाव राजा शहरात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी स्वागत केले.यावेळी त्यांच्यासमवेत खासदार संजय राऊत होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दोन दिवसीय बुलढाणा जिल्ह्या च्या दौऱ्यावर असल्याने आज दुपारी त्यांचे देऊळगाव राजा शहरात आगमन झाले. त्यावेळी हॉटेल गोकुळ मध्ये शिवसेना, कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस त्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन स्वागत केले. यावेळी तालुकाप्रमुख दादाराव खार्डे, ज्येष्ठ नेते छगनराव मेहत्रे,माजी नगराध्यक्ष गोविंद झोरे, युवा सेना नेते राजीव नागरे, अजय शिवरकर, ज्येष्ठ कॉंग्रेस नेते अनिल सावजी, रमेश दादा कायंदे, गजानन काकड, विष्णू झोरे, हनिफ शाह, राष्ट्रवादीचे नेते राजेश इंगळे, गजानन चित्ते, जहीर पठाण, माजी उपनगराध्यक्ष पवन झोरे, संतोष पुजारी, तौसिफ़ कोटकर, पवन बोराटे आदींची उपस्थिती होती.



# संत गजानन महाराज प्रगटदिनी शिवमहापूराण कथेचे भव्य आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील प्रसिद्ध असलेल्या संत श्री गजानन



महाराज मंदिर मोंढा परिसर चैतन्योदय गुरुकुल आश्रमात दर वर्षी प्रमाणे याही वर्षी गजानन महाराज प्रगट दिन सोहळ्या निमित्त या वर्षी शिव-महापुराण कथेच आयोजन करण्यात आले असून कथा प्रवक्ते सू प्रसिद्ध कथाकार हभप श्री गणेशानंद महाराज परळीकर आहेत या निमित्त आयोजित सर्व कार्यक्रमास भक्त मंडळीने सहभागी होऊन श्रवणाचा लाभ घ्यावा असे गुरुकुल आचार्य महेश महाराज जिंतूरकर यांनी केले आहे. या निमित्त कथेच्या दरम्यान होणार असलेल्या सर्व कार्यक्रमाची त्यांनी माहिती दिली दिनांक 25फेब्रुवारी पासून प्रारंभ असून सांगता दि3मार्च रोजी होईल दैनंदिन कार्यक्रम सकाळी 9ते 11 श्री गजानन ग्रंथ पारायण सोहळा आयोजित असून शिवमहापुराण कथे ची वेळ दुपारी 1ते 4 सायंकाळी हरिपाठ तर रात्री 8ते 9 ॐ नमः शिवाय जप होईल शेवट काल्याचे कीर्तन हभप श्री माऊली महाराज मुडेकर यांचं आयोजित केल आहे कथा यजमान सौं जया ताई यादवराव थिटे पाटील या असून या निमित्त अन्न दान हे सार्वजनिक होणार आहे म्हणून भक्त मंडळींना अन्न दान साठी सुवर्ण संधी आहे पंगती साठी आवश्यक साहित्याचे वेगळे वेगळे साहित्य आपणास दान करता येईल त्या साठी भक्तांनी संपर्क करावा आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवाहन पण आचार्य महेश महाराज जिंतूरकर यांनी केले आहे.

# अखेर 'त्या' अपघातातील नागरिकाचा मृत्यू

## उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या वाहनाची धडक; नातेवाईकाकडून चार तास पार्थिव पोलीस ठाण्यात ठेवून ठिय्या

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरातील पोलीस ठाण्याच्या गेट मध्ये वरुड (नृ) येथील एक वयोवृद्ध नागरिक जखमी अवस्थेत पडलेला पोलिसांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता प्रकृती चिंताजनक असल्यामुळे डॉक्टरांनी प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविले, मात्र उपचारा दरम्यान त्या नागरिकाचा मृत्यू झाला असल्याची घटना घडली प्राथमिक माहिती सुरुवातीला पोलिसांकडून नातेवाईकांना देण्यात आली परंतु या घटनेने गुरुवारी वेगळेच वळण घेतले आणि सदरील अपघात हा बुधवार 21 फेब्रुवारी रोजी रात्री 7.30 वाजेच्या सुमारास उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या च्या गाडीचा धक्का लागुन आपघात झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असता गुरुवारी सकाळी १२ वाजता मयताचा पार्थिव देह पोलीस स्टेशनमध्ये आणून पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांनी केली परंतु पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याने पोलीस स्टेशनमध्ये नातेवाईक आणि पोलीस यांच्यामध्ये जोरदार बाचाबाची होऊन तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान नातेवाईकांनी मयताचे पार्थिव सायंकाळी चार वाजेपर्यंत पोलीस ठाण्याच्या पायरीवर ठेवून गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली.

जिंतूर तालुक्यातील वरुड(नृ)येथील दत्ता बन्सी डोंबे (वय 56 वर्ष) कामानिमित्त शहरात आले होते. यावेळी पोलीस ठाण्याच्या गेट मध्ये रात्रीच्या सुमारास पोलीस ठाण्यासमोर जखमी अवस्थेत पोलिसांना आल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली यावेळी पोलिसांनी त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान संध्याकाळी उपचार त्यांचा मृत्यू झाला जिंतूर पोलीस स्थानकातील पोलिस वाहनाचा जोरदार धक्का लागून संबंधित व्यक्ती मयत झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असता सुरुवातीला पोलिसांकडून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी गुन्हा दाखल करण्याच्या प्रक्रियेमध्ये जाणीवपूर्वक गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास नातेवाईकाची दिशाभूल केली असल्याचा आरोप यावेळी नातेवाईकांनी केला.

दुपारी एक वाजता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी घटनास्थळी भेट देऊन नातेवाईक यांना शांत करून पोलीस स्थानकातील अपघाताचे व्हिडिओ फुटेज तपासले असतात या फुटेज च्या प्राथमिक पाहणी मध्ये सदरील अपघात हा उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या वाहन क्र. MH- 22 D-7247 झाल्याचे निष्पन्न झाल्याचे समोर आल्याने मयताचे नातेवाईक यांनी एकच जोरदार पोलीस स्थानकामध्ये गोंधळ घातला यावेळी पोलीस व नातेवाईक यांच्यामध्ये जोरदार बाचाबाची झाली, मयताच्या नातेवाईकांनी प्रेत पोलीस स्थानकाच्या पायरीवर ठेवून जोरदार आक्रोश केला. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक घोरबांड यांच्या मध्यस्थीने तणावपूर्ण वातावरण शांत करून मयताची नातेवाईक उद्धव विश्वनाथ डोंबे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका सोशल माध्यमाच्या ग्रुप वरती त्यांचे चुलत काका मयत दत्ता बन्सी डोंबे हे बेशुद्ध अवस्थेत सरकारी दवाखाना येथे असल्याचे फोटो त्यांना मिळाले. त्यानंतर त्यांनी रुग्णालय गाठले असता त्यांनी त्या ठिकाणी आलेल्या नातेवाईकांनी आक्रोश करून सदरील अपघात हा पोलीस स्टेशन जिंतूरचे गेटच्या आत मध्ये झाल्याचे सांगितले.

यावेळी भास्कर लिपने यांनी तो आपघात पाहिले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत सांगण्यात आले आहे यावरून उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या गाडीचे चालक यांच्याविरुद्ध रीतसर तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच सदरील तक्रारी मध्ये उपविभागीय अधिकारी हे स्वतः त्या ठिकाणी हजर असतानाही त्यांनी सदरील व्यक्तीस दवाखान्यात हालविण्यासाठी एक तास उशीर लावला असल्याने त्यामुळे तो मरण पावल्याचा आरोप ही नातेवाईकांकडून फिर्यादीमध्ये करण्यात आला आहे. यावेळी पोलीस उपअधीक्षक यशवंत काळे यांनी जिंतूर पोलीस स्टेशन येथे भेट देऊन घटनेची माहिती घेतली.मयताच्या पश्चात पत्नी दोन मुल सुना नातवंड असा परिवार आहे.

# पैठण शहरातील प्रतिष्ठान महाविद्यालयात उच्च माध्यमिक शालांत परीक्षा सुरळीतपणे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील प्रतिष्ठान महाविद्यालयात उच्च माध्यमिक शालांत ईयत्ता बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू आसुन प्रतिष्ठान महाविद्यालयाचे केंद्रप्रमुख विस्वास गव्हाणे याच्या नियंत्रणाखाली एकूण 547 विद्यार्थी विद्यार्थिनी असून २2 हॉल मध्ये परीक्षा सुरू आहे. या ठिकाणी कॉपीमुक्त अभियानाचे बैठे पथक तैनात करण्यात आले असून मिसाळ,केकान,वाडेकर हे काम पाहत आहेत. ईग्रजी,हिंदी,मराठी हे भाषाविषयक पेपर आगदी सुरळीतपणे पार पडले असुन परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी तहसीलदार सारंग चव्हाण, व गटविकास अधिकारी कुलकर्णी हे कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षा होत असल्याची खात्री करीत आहेत.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य शिवानंद सोनकांबळे,उपप्राचार्य वैजीनाथ चाटे,प्रबंधक शेखर शिंदे,प्रा.शैलेश शिसोदे,प्रा.युवराज औटे,प्रा.रविंद्र अंधोरीकर,महेश गोंडे,प्रा.कडुनाथ कोकरे,प्रा,जयश्री गायकवाड,प्रा.नेहा आहुजा,प्रा.नुतन जिनवाल,हे परीक्षा काळात जबाबदारी पार पाडत असुन दिपक पालवे,चव्हाण.पी.एस,मुर्दाडे एस.डी,संजय रूपेकर काम पहात आहे.



# मोदींच्या सभेसाठी २६ एकरांवर मंडप

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत २८



फेब्रुवारी रोजी शहरानजीक भारी येथील मैदानावर बचत गटाच्या महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ४२ एकर खुल्या जागेवर हा मेळावा होणार असून २६ एकरवर सभा मंडप उभारला जात आहे. जवळपास दोन लाख महिला या मेळाव्यासाठी आणण्याचे सरकारी नियोजन सुरू आहे. या मेळाव्याच्या अनुषंगानेपालकमंत्री संजय राठोड यांनी आज गुरुवारी येथील महसूल भवनात आढावा घेतला. कार्यक्रमाच्या तयारीसाठी प्रशासनाच्यावतीने विविध प्रकारच्या ३० समित्या तयार करण्यात आल्या आहे. मेळाव्यासाठी जिल्हाभरातून येणाऱ्या महिलांची प्रवास, बैठक, पाणी व्यवस्था उत्तमपणे होणे आवश्यक आहे. परिसरात स्वच्छतागृह पुरेशा प्रमाणात उभारण्यात यावे. येथे येणाऱ्या महिलांच्या गर्दी व्यवस्थापनासह स्टेज, मंडप, वाहनतळ, सुरक्षा आदींचा पालकमंत्र्यांनी आढावा घेतला. महिलांसाठी बसेसची व्यवस्था प्रशासनाच्यावतीने करण्यात आली आहे. त्यासाठी बसनिहाय समन्वयक व तालुका स्तरावर संपर्क अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी सांगितले. २०१४ पासून मोदी हे तिसऱ्यांदा जिल्ह्यात येत आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान पदाचे दावेदार असताना त्यांनी आर्णी तालुक्यातील दाभडी येथे शेतकऱ्यांसमवेत 'चाय पे चर्चा' करून शेतमालास हमीभाव देण्याची ग्वाही दिली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केळापूर येथे महिला मेळाव्यासाठी ते आले होते.

# वाजवा तुतारी आणि गाडा गद्दारी : जितेंद्र आव्हाडांचा नवा नारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाने अखेर पक्षचिन्ह दिलं आहे. निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला तुतारी हे पक्षचिन्ह आहे. पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून ही माहिती देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनाव व घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाला नेमकं कोणतं नाव किंवा चिन्ह मिळणार? याची उत्सुकता राजकीय वर्तुळात होती. त्यासाठी शरद पवार गटाकडून तीन नावांचे पर्याय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले होते. त्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार असं नाव देण्यात आलं. परंतु, हे नाव येत्या २८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीपुरतं होतं. त्यामुळे या निवडणुकीकरता पक्षाला चिन्ह देण्यात आलं नव्हतं. त्यामुळे हे प्रकरण शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात नेले होते. आता या प्रकरणी जितेंद्र आव्हाडांनी प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार या पक्षाला निवडणूक आयोगाने पक्षचिन्ह दिलं आहे. एका योद्ध्याला शोभेल असंच हे पक्षचिन्ह आहे. ८४ वर्षांचा म्हातारा, होय मी त्यांना असंच म्हणतो. कारण ८६ वर्षांचा म्हातारा युद्धाला उभा राहिला आहे आणि संकेत काय मिळाले आहेत? तर तुतारी. वाजवा तुतारी आणि गाडा गद्दारी. तुतारी वाजली आहे, युद्धासाठी आम्ही आता तयार आहोत. शरद पवार युद्धाला उभे आहेत. महाराष्ट्रातल्या राजकीय भूमीतले भीष्माचार्य म्हणजे शरद पवार त्यांच्यासह आम्ही ही लढाई लढण्यासाठी तयार आहोत. लडेंगे और जितेंगे.. परत एकदा सांगतो.. वाजवा तुतारी. असं म्हणत जितेंद्र आव्हाडांनी प्रतिक्रिया दिली आहे. सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार शरद पवार गटाला चिन्हासाठी निवडणूक आयोगात अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

# ॲडव्हान्टातर्फे दे. राजा हायस्कूलला प्रयोगशाळा साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** ॲडव्हान्टा एंटरप्राइजेस लिमिटेड द्वारे दे.राजा हायस्कूल ला प्रयोगशाळा साहित्याचे वाटप करण्यात आले. या साहित्य वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष ओमप्रकाश धन्नावत,तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून मा. सुबोधभाऊ मिश्रिकोटकर,संचालक राजकुमारजी डोणगावकर,अनिलकुमार गुप्ता, गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले होते. साहित्य वितरण कंपनीचे मा.सतीश हेगडे, रेनिथा काकानी (सीएसआर.प्रोजेक्ट मॅनेजर ) व इत्तर सर्व अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत गीत कु.आर्या मिनासे या विद्यार्थिनीने सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य आर. बी.कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन पी. के. राठोड व मित्तल मॅडम यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार उप प्राचार्य व्ही. डी.देशपांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मदत केली.



# अशोक चव्हाण अग्नीपरिक्षेत 'पास' होतील का ?

## दलित, मुस्लिम मतदार ठाम : ओटबँक टिकणार का ?

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच नांदेडसह भोकर विधानसभा मतदारसंघातील जनतेचे जिव्हाळ्याच नात आहे.. चव्हाण कूंटूबियांना येथील जनतेनी भरभरून प्रेम दिलं.. त्यामुळे त्यांच पहिल प्रेम हे नांदेडकरावर आहे.. भोकर मतदार संघातून पितापुत्रांनी राजकीय वाटचाल सुरू केली.. आजहि राजकीय क्षेत्रात त्यांचा तोच दबदबा कायम आहे.. हक्काची "ओटबॅंक" असलेल्या जिल्ह्यात चव्हाणांनी अचानक बदलेल्या निर्णयाने राजकीय समीकरण बदलणार आहे.. दलित, मुस्लिम मतदार ठाम असुन..विस्कटलेली घडी पुन्हा कायम ठेवण्यासाठी मोठा "आटापिटा "करावा लागणार



आहे..या अग्नीपरिक्षेत ते "पास" होतील की नाही हे पाहण औत्सुक्याचे ठरणार आहे.
मराठवाड्यात प्रारंभी माजी मुख्यमंत्री (कै.) विलासराव देशमुख,माजी उपमुख्यमंत्री (कै. ) गोपीनाथ मुंडे , अशोक चव्हाण असे दिग्गज लोकनेते असल्याने राजकीय क्षेत्रात वेगळी छाप होती. यापैकी मुंडे, देशमुख यांच निधन झाल्याने आता केवळ अशोक चव्हाण एकमेव लोकनेता ऊरला आहे. मराठवाड्यातील लोकाभिमुख विकास कामे मार्गी लावण्यासाठी ते नेहमी "राजदरबारी" आवाज ऊठवतात.मराठवाड्यासह राज्यात कॉंग्रेस पक्षाला चारहत्तीच बळ देऊन नवचैतन्य निर्माण केले. दरम्यानच्या काळात अनेक चढउतार पार करावे लागले. तरी न डगमगता मोठ्या ध्यर्याने आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली. अचानक त्यांनी भाजपाशी हातमिळवणी केल्याने एकच खळबळ उडाली आहे.त्यांच्या ठेवणीतल्या कार्यकर्त्यांची मात्र गोची झाली आहे.बरेचजण चिळीमीळी चुप्प असुन दोन्ही डगरीवर हात ठेवून आहेत. निवडणूकीच्या हंगामात कोण कूण्यापक्षाचा झेंडा हाती घेईल हे खरे चित्र स्पष्ट होईल.
नांदेडसह भोकर विधानसभा मतदारसंघातील कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आता नव्याने भाजपाशी जूळवुन घेतील का,मोजकेच कार्यकर्ते चव्हाणांच्या बाजूने असल्याचे उघडपणे सांगतं आहेत.
छुपेरूस्तुमांची बरीच संख्या आहे.कॉंग्रेस मधील नाराजगट आता सक्रिय झाला आहे. आमदारासह अन्य बडे नेते मंडळी मुगगीळुन गप्प आहेत.मतदार हि बुचकळ्यात पडला आहे. या सर्व बाबीवर योग्य तो निर्णय घेवून त्यांना भाजपाशी कसे जूळवून घेत जुन्या-नव्या सहका-याचे मनोमिलन करताना मोठी कसरत करावी लागणार आहे.

**दलित-मुस्लीम मते कुणाची :** प्रारंभी पासून दलित मुस्लिम बांधव हा भाजपचा विरोधक म्हणून ओळख आहे . मोजकेच दलित-मुस्लीम भाजपाच्या बाजूने आहेत .आजपर्यंत हा समुह कॉंग्रेस पक्षाच्या बाजुनी ऊभा होता . कॉंग्रेसचे अशोक चव्हाण भाजपात गेल्यावर त्या समुहाची मते मिळणं कठीण आहे .कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, वंचित बहूजन आघाडी, एमआयएम कडे मतविभागणी होईल असे दिसते .शक्यतो ती मते भाजपला मिळत नाहीत .आता अशोक चव्हाण काय डावपेच टाकतील याकडे लक्ष लागून आहे .अशा गुंतागुंतीच्या राजकारणातुन मार्ग काढीत राजकीय डोलारा साबीत ठेवण्यासाठी अग्नीपरिक्षेला सामोरी जावं लागणार आहे त्यात ते पास होणार का हे येणारा काळच ठरविणार आहे .

# विश्वकर्मा जयंती महोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** दि.22 रोजी गुरुवारी जिंतूर तालुका श्री विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने व सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत प्रभू भगवान श्री विश्वकर्मा आरती व पूजन तसेच जयंती उत्सव आनंदेश्वर मंदिर गणपती गल्ली जिंतूर या ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या ठिकाणी संघटनेचे राज्य सचिव राम रेघाटे तालुकाध्यक्ष कैलास राऊत तालुका उपाध्यक्ष गजानन पांचाळ/गणेश रेघाटे, संघटक सुरेश पांचाळ, सचिव श्रीराम पांचाळ, कोषाध्यक्ष निलेश नगरकर, प्रवक्ता अशोक पांचाळ, प्रसिद्धीप्रमुख रविकांत पांचाळ, सहसचिव खंडू शिंदे, माऊली पांचाळ, दत्तात्रय तळेकर, आश्रुबा पांचाळ, प्रल्हादकाका बोंडफळे, नागेश पांचाळ, भगवान पांचाळ, बंडू बोंडफळे ( आचारी) गणपतराव पांचाळ, श्याम रेघाटे, संजय नगरकर, राहुल गायकवाड, नवनाथ पोपळघट व समाज भूषण पुरस्कार प्राप्त मा.ज्येष्ठ पत्रकार व संघटनेचे सल्लागार राजाभाऊ अण्णा नगरकर तसेच विश्वकर्मा महिला बचत गटाच्या व इतर महिला बचत गटाच्या महिलांनी सहभाग नोंदविला मंदिर परिसरातील सर्व समाज बांधवांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थिती दर्शविली सर्व पदाधिकारी तसेच सर्व समाज बांधव व परिसरातील इतर समाज बांधवांच्या उपस्थित व सर्वांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रम आनंदात साजरा करण्यात आला. सर्व पत्रकार बांधवांनी कार्यक्रमाचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.





# अश्वमेध महायज्ञातून दूर होईल मनाचे प्रदूषण

## सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पाच दिवसीय अश्वमेध कुंडीय महायज्ञ वायूमंडळाला तर प्रदूषणातून मुक्त करणारच आहे, शिवाय विचारांच्या यज्ञातून मनाचे प्रदूषणही दूर होणार आहे. गायत्री परिवाराच्या माध्यमातून समाजाला मनाची शुद्धता प्रदान केली जाईल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तसेच मत्स्य व्यवसाय मंत्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. विश्व गायत्री परिवाराच्या वतीने खारघर (नवी मुंबई) येथील कॉर्पोरेट पार्क ग्राऊंडवर आयोजित अश्वमेध महायज्ञाच्या उद्घाटन सोहळ्यात मुनगंटीवार बोलत होते.
या महायज्ञाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम श्री. रमेश बैस यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्यमंत्री व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. विश्व गायत्री परिवाराचे गुरुवर्य डॉ. श्री. चिन्मय पंड्या, श्रद्धेय शैल दिदी, सौ.सपना मुनगंटीवार,श्रीमती शेफाली पंड्या तसेच गायत्री परिवाराच्या सदस्यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी मुनगंटीवार यांनी यज्ञ परिसरात आयोजित प्रदर्शनालाही भेट दिली. महाराष्ट्राचा सांस्कृतिक कार्यमंत्री या नात्याने भगवान विठ्ठलाच्या भूमीत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीमध्ये सर्व भाविकांचे स्वागत करताना आनंद होत असल्याची भावना ना. श्री. मुनगंटीवार यांनी सुरुवातीला व्यक्त केली. यज्ञाच्या निमित्ताने मातृशक्ती संघटित होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. भारतवासीयांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. कारण या देशाचा अभिमान आणि उर्जा असलेल्या प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा अयोध्येत झाली. त्यातही मी स्वतःला सर्वाधिक भाग्यवान समजतो. कारण अयोध्येतील पवित्र मंदिरामधील गर्भगृहासह प्रत्येक ठिकाणचा दरवाजा माझ्या विधानसभा मतदारसंघातील सागवान काष्ठापासून तयार झालेला आहे. माझ्या महाराष्ट्राच्या भूमितील लाकडापासून ही दारे तयार झालेली आहेत. रामलल्लाच्या (बालकराम) मंदिरात जायचे असेल तर जगातील कोणत्याही रामभक्ताला महाराष्ट्राच्याच दारातून जावे लागणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड भूमीतूनच याची सुरुवात होत आहे, याचा मला मनापासून आनंद आहे.' पाषाण युगापासून आतापर्यंत मानवाने प्रत्येक टप्प्यावर प्रगती केली. पूर्वीच्या काळात तंत्रज्ञान व विज्ञान प्रगत नव्हते, पण सुख समाधान होते. आज विज्ञान व तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे, मात्र प्रत्येक कुटुंबात सुख समाधानाचा अभाव आहे.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार युवक गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव मही :** ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार युवक गंभीर जखमी झाल्याची घटना देऊळगाव मही येथील बाजार समिती समोर गुरुवारी रात्री घडली. अपघातातील जखमी युवकास जास्त मार लागल्याने जालना येथे हलविण्यात आले आहे.
याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार फिर्यादी यांच्या भावाचा साला नामे पवन शिवहरी केदार वय २५ रा. धोत्रानंदई हा आपल्या दुचाकी क्रमांक एम एच २८ झेद २१०८ ने घराकडे जात असताना ट्रक क्रमांक एम एच २३ डब्ल्यू६०८२ च्या चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून दुचाकीला जबर धडक देऊन चालकास गंभीर जखमी केले. गंभीर मार लागल्याने दुधाची चालकास प्रथमोपचार नंतर जालना येथे हलविण्यात आले आहे. पोलिसांनी शिवानंद बाबुराव मुंडे वय ३६ राहणार धोत्रानंदई यांच्या फिर्यादीवरून ट्रक चालका विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. सदर अपघात प्रकरणात हेडकॉन्स्टेबल कलीम देशमुख तपास करीत आहे.



# आदर्श शिक्षक कराळे गावकऱ्यांकडून सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथील जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांचे शैक्षणिक कार्य पाहून गावकऱ्यांनी तसेच ग्रामपंचायत मल्हारा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष संपूर्ण सदस्य यांच्याकडून शाल श्रीफळ शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने गावातील लोक उपस्थित होते. ग्रामपंचायत सरपंच माननीय नारायणराव बोरेकार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तमरावजी शेळके, उपाध्यक्ष दीपक तायडे मुख्याध्यापिका कुमारी शीला सोळंके, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, कल्पना चौधरी बबीता पंडित किरण साखरकर रश्मी पाझाडे दिनकर राऊत रतीराम मावस्कर तसेच मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते. कराळे सर यांचे शैक्षणिक कार्य तसेच उपक्रम शील कार्य पाहून गावकरी तथा सरपंच यांनी पुढाकार घेऊन कराळे सर यांचा समस्त गावकरी मंडळी समोर सन्मान केला.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आई म्हणजे पराक्रमाचे मातृत्व : हभप तुकाराम महाराज शास्त्री

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** आई म्हणजे पराक्रमाचे मातृत्व आहे असे प्रतिपादन भागवताचार्य हभप तुकाराम महाराज शास्त्री यांनी लोहा येथे कै. लक्ष्मीबाई अमृतराव क्षीरसागर यांच्या गोडजेवणाच्या कार्यक्रमात केले. लोहा येथील देवराव मुकदम वाचनालयाचे संस्थापक अमृतराव क्षीरसागर आडगावकर गुरुजी यांच्या पत्नी कै. लक्ष्मीबाई अमृतराव क्षीरसागर यांचे निधन झाले त्याच्या गोड जेवणा निमित्ताने आज बुधवार( २१ फेब्रु.) सकाळी अकरा वाजता ह. भ. प गुरुवर्य भागवताचार्य तुकाराम महाराज शास्त्री मुंडे यांच्या कीर्तन सोहळा व गोडजेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी



आमदार रोहिदास चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम,आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे, नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण,शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, माजी न.प. सभापती अप्पाराव पाटील पवार, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील पवार, आझाद ग्रूपचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पांडे,आझाद ग्रुपचे प्रदेश कार्यकारिणी दिपक रायफळे, आझाद ग्रुपचे तालुकाध्यक्ष रूद्रा पाटील भोस्कर, काशिनाथ शिरसीकर सर, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना भागवताचार्य हभप तुकाराम महाराज शास्त्री म्हणाले की, देव केवढा ब्राम्हांड केवढा देवाला पोटात संभाळणारी माता आई आहे तुकोबाराया म्हणतात अशी प्रेम करणारी माझी आहे. प्रत्येकांने आई वडीलांची सेवा करावी . कै. अमृतराव क्षीरसागर गुरुजी यांनी वाचनालय काढून समाजसेवा केली त्यांच्या दोन्ही मुली दोन्ही जावई हे चांगल्या पदावर आहेत असे भागवताचार्य हभप तुकाराम महाराज शास्त्री म्हणाले. तसेच यावेळी संत तुकाराम महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज, पंढरीचा पांडुरंग यांची आपल्या कीर्तनातून माहिती दिली, गीत गाऊन आपल्या कीर्तनातून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कै. लक्ष्मीबाई अमृतराव क्षीरसागर यांच्या जेष्ठ मुलगी सहशिक्षिका सौ. बालीका ज्ञानेश्वर अन्नकाडे, जावई विक्रीकर निरीक्षक ज्ञानेश्वर अन्नकाडे, कनिष्ठ मुलगी मंडळ अधिकारी सौ.प्रियंका विनोद गवते,जावई सहशिक्षक विनोद गवते यांच्या सह सर्व पाहुणे मंडळी, मित्रमंडळी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कधी मिळणार: विद्यार्थ्यांचा आर्त टाहो...!

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील विविध शाळांमधील 155 विद्यार्थ्यांची राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती एन एम एम एस गेल्या चार वर्षापासून दप्तर दिरंगाई मुळे अडकली असून त्या विद्यार्थ्या ची पदवी परीक्षा ही संपत येत असल्याने दुर्बल घटक विद्यार्थि, पालक यांनी पुढील शिक्षणासाठी काय करावे असा यक्ष प्रश्न ही भेडसावत आहे.

तर विद्यार्थी मात्र शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ताधारक असून देखील त्यांना आज शिष्यवृत्ती मिळालेली नसल्याने त्यांचा शिष्यवृत्तीवरील विश्वास उडत चाललेला असून आमची शिष्यवृत्ती कधी मिळणार ? असा आर्त टाहो ही ते फोडत आहेत. त्या विद्यार्थ्यांचे पालक मात्र मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी, कार्यालयासह जिल्हाधिकारी कार्यालयात खेटे मारत असून जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी माध्यमिक विभागाकडून ऑनलाइन पडताळणी वेळेत पूर्ण केली नसल्यामुळे ही प्रक्रिया रखडली असल्याचे सांगितले जात असली तरीही राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना अंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी 12 हजार रुपये शिष्यवृत्ती मिळावयास हवी होती ही शिष्यवृत्ती पुढे बारावीपर्यंत कायम असते सन शैक्षणिक वर्ष 2018 - 19 मध्ये जिल्ह्यातील अनेक शाळेतील विद्यार्थी व शिष्यवृत्ती योजनेस पात्र ठरले होते मात्र त्यापैकी 155 विद्यार्थ्यांना अद्यापही शिष्यवृत्ती मिळालेली नाही बहुतांशी विद्यार्थ्यांचे पालक आर्थिक दुर्बल घटकातील आहेत. त्यांच्या पाल्यांनी उच्च शिक्षणासाठी इतरत्र प्रवेश घेतलेले आहेत. हे सर्वसामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे मुलांच्या पालन पोषण व शिक्षणासाठी तारांबळ उडत असून काही विद्यार्थ्यांना पहिला 12000 रुपयाचा हप्ता मिळाल्यांचे कळते मात्र उर्वरित वर्षांची रक्कम अद्यापही त्यांना मिळालेली नाही. शिष्यवृत्ती बाबत विद्यार्थी पालकांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे चौकशी केली तर त्यांच्याकडून आम्ही आमचे काम केले जिल्हा परिषद ला भेटा अशी सबब सांगून वेळ ढकलून दिल्यांचे काम केले जाते .व जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे बोट दाखवले जाते. शिक्षणाधिकारी यांचे कडे चौकशी केल्यानंतर ते सुद्धा हा प्रश्न माध्यमिक विभागाच्या अखत्यारित येतो तिकडे संपर्क साधा असे सांगतात त्यानुसार पालक शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या कार्यात खेटे मारत असून आकांक्षा बाळासाहेब रामपूरकर या विद्यार्थिनींचे पालक बाळासाहेब रामपूरकर ही मागील चार वर्षापासून पाठपुरावा करत आहेत. मात्र अधिकारी उडवाउडुचे उत्तरे देऊन चालढकल करत असुन शिक्षणाधिकारी माध्यमिक गरुड मॅडम, सलगर सर तर आता ससाणे सर यांच्याकडे खेटे मरूनही कोणतीच माहिती दिली मिळत नाही पालकांच्या म्हणण्यानुसार पाल्यांची कोणतीही चूक नसताना कोणत्या कारणामुळे शिष्यवृत्ती लाभापासून वंचित ठेवले जाते आहे .असा प्रश्न उपस्थित केला जात असून त्या संबंधित अधिकारी कर्मचारी यांचे चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे काम करण्यात यावे अशी ही शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मागणी होत आहे.

**मागील चार वर्षापासून पाठपुरावा :** माझी पाल्य आकांक्षा रामपूरकर ही एन एम एम एस शिष्यवृत्ती पहिल्या क्रमांकाची पात्र ठरल्यानंतर तिला खूप अशा निर्माण झाल्या परंतु त्यानंतर मागील चार वर्षापासून मुख्याध्यापक जवाहर विद्यालय जिंतूर ते गटशिक्षणाधिकारी जिंतूर शिक्षणाधिकारी माध्यमिक परभणी जिल्हाधिकारी तसेच शिक्षण संचालक पुणे यांच्यापर्यंत कागदपत्रे निवेदने अर्ज सादर करून पाठपुरावाही केला .या शिष्यवृत्तीला पात्र झाल्यामुळे नंतर दहावीला 97 टक्के मार्क प्राप्त होऊन देखील पहिली शिष्यवृत्ती प्राप्त असल्याने दुसऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ देखील मिळाला नाही .त्यातच जिंतूर येथील जवाहर विद्यालयाचे 22 विद्यार्थि पात्र झाले होते .

विद्यार्थांना शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण होवुन होवुन देखील त्यांच्या पदरी निराशाच का ? व मुजोर अधिकारी, कर्मचारी मोकळेच . माझी आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कुटुंबांचा उदरनिर्वाह भागवताना दमछाक होते . त्यातच मुलांच्या उच्यशिक्षणाचा खर्च झेपने अवघड होत असून शिष्यवृत्तीची रक्कम मिळाल्यास थोडाफार हातभार लागेल व विद्यार्थ्यांना काही चांगलं केल्यांची भावना निर्माण होईल .
**बि .डी .रामपूरकर पालक, जिंतूर**



# शानाभाऊचे सीओ कार्यालयाबाहेर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिंदखेडा तालुक्यात एका शाळेत शिक्षक नाहीत आणि जे उर्वरित शिक्षक आहेत ते वर्गात बसून दारू पितात त्या गावात गेल्या पंधरा वर्षापासून रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागत नाही अशा विषयांवर अनेक वर्षापासून जिल्हा परिषद सदस्या सुनिता सोनवणे सभागृहात आवाज उठत आहे त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यामुळे शानाभाऊ सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली आज अचानक मुख्य कार्यकारी अधिकारी गुप्ता यांच्या दालनाबाहेर विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आंदोलन करण्यात आले काही दिवसांपूर्वी शिंदखेडा तालुक्यात एका मुलीवर घातपात करून तिला शेतात फेकण्यात आले होते त्या अभितीमुळे अनेक विद्यार्थिनी शाळेत जाण्यासाठी घाबरत आहेत. ह्या ठिकाणी कार्यकारी अधिकारी यांना शाना भाऊ यांनी त्यांच्या दालनात जाण्यास मज्जाव केला त्या ठिकाणी जिल्हा परिषद चे अधिकारी गणेश मोरे व इतर अधिकारी त्यांची समजूत काढून त्यांना आश्वासन दिले परंतु शाना भाऊ सोनवणे व त्यांच्यासोबत असलेले सरपंच हे ठाम राहिले व त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी बोलवून त्यांना उचलण्याचा प्रयत्न केला व काही वेळातच त्यांच्या मागण्या मान्य करून तोंडी आश्वासन देण्यात आले आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# पत्रकार आकाश सोनवणे यांनी सापडलेला मोबाईल केला परत; प्रामाणिकपणाचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि. २२ रोजी पत्रकार आकाश सोनवणे हे त्यांच्या मुलाला शाळेतून घरी परत जात असतांना अग्रसेन विद्यालय ठिकाणी शैलेश कर्वे हा शासकीय पॉलीटेक्निक येथील विद्यार्थी कॉलेज जात असताना त्याच्या खिश्यातून अचानक रेडमी कंपनीचा मोबाईल खाली पडला आकाश सोनवणे यांनी त्याचा पाठलाग करून थांबविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो थांबला नाही त्या नंतर त्यांचा फोन आला असता आकाश सोनवणे यांनी प्रामाणिक पणे त्यांना बोलवून तो मोबाईल त्याला देण्यात आला त्या ठिकाणी शैलेश कर्वे याचे मन भरून गेले व त्याच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले व त्याने पत्रकार आकाश सोनवणे यांचे आभार मानले.